**G + 1 घर विकणे आहे**

जुळे सोलापूर येथे प्राइम लोकेशनमध्ये सु-निर्मित G + 1 घर विकणे आहे. भूखंड क्षेत्र : ११२० चौ. फूट. बिल्ट-अप क्षेत्र : ९७० चौ. फूट. बांधकाम : Ground floor-1BHK टॉयलेट, बाथरूम. पहिला मजला - १ रूम, टॉयलेट, बाथरूम. (विस्तृत आणि हवेशीर)

ठिकाण : १२४, शिवगंगा नगर भाग २, गोविंदश्री मंगल कार्यालयाजवळ, जुळे सोलापूर, भरपूर नैसर्गिक प्रकाश आणि वायुवीजन, शाळा, डी मार्ट, बाजारपेठ यांच्या जवळ.

अपेक्षित किंमत : ७८ लाख + टॅक्स

संपर्क : माशाळकर दयानंद - ९४२३३३१७५२, सदानंद माशाळकर - ९९२४१४८९७०-७८

दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com

**लक्ष्मी लॉन्स मंगल कार्यालय**

फक्त ५१०००/- रु.
जेवणासह (अटी लागू)

• निसर्गरम्य हवेशिर वातावरण • पाण्याची भरपूर सोय • जेवणासाठी स्वतंत्र हॉल • वधू-वरांना स्वतंत्र रूम्सची सोय • २४ तास लाईटची सोय

**श्री स्वामी समर्थ सेवा आश्रम ट्रस्ट**

अक्कलकोट-सोलापूर एन.एच.रोड, अक्कलकोट
मो. ९३२६१५८१५१ / ८६२५००५१११

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष १९ वे, अंक १४७ वा | शुक्रवार, दि. १० जानेवारी २०२५ | पाने ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

**हुरडा पार्टी**

**शालेय सहल व हुरडा पार्टी**

आनंददायी शालेय सहल व निसर्गाच्या सानिध्यात हुरडा पार्टी साठी कल्याणम कृषी पर्यटन केंद्र, काटगाव फाटा, तांदुळवाडी, हैदराबाद रोड, सोलापूर.

मो. ९८६०६३४८३४ / ९८६००९३०११

**वाडा भाड्याने देणे आहे**

बस स्थानकापासून जवळ आणि पोस्ट ऑफिससमोरील मध्यवर्ती ठिकाणी असलेला करजगी ता. अक्कलकोट या गावातील 5 हजार स्वे. फूट बांधकाम असलेला जुना वाडा तळघरासाहित भाड्याने देणे आहे. बँक, पतसंस्था, वैद्यकीय व्यवसाय आणि शासकीय कार्यालयासाठी बहुउपयोगी.

अधिक माहितीसाठी संपर्क: 9975434591

# ‘मरणारा शेतकरी हिंदू नाही का?’

## बच्चू कडू शेतकऱ्यांच्या प्रश्नावर आक्रमक

**अमरावती (कटूसत्य वृत्त)**:- पश्चिम विदर्भात वर्षभरात १ हजार १५१ शेतकऱ्यांच्या आत्महत्या झालेल्या असताना या प्रश्नावर सरकारची संवेदनशीलता दिसत नाही. आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांमध्ये हिंदू शेतकऱ्यांची संख्याच जास्त आहे. राज्यात आणि केंद्रात हिंदुत्ववादी सरकार आहे. मग तरीही हिंदू शेतकऱ्यांवर स्वतःला संपवण्याची वेळ का येते? असा संतप्त सवाल बच्चू कडूंनी सरकारला विचारला आहे.

प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष बच्चू कडू आणि राष्ट्रीय समाज पक्षाचे नेते महादेव जानकर यांच्या नेतृत्वात येथील विभागीय आयुक्त कार्यालयासमोर शेतकरी आणि मेंढपाळांच्या विविध मागण्यांसाठी ह्यवाडा आंदोलनह्ण सुरू करण्यात आले आहे. यावेळी प्रसार माध्यमांशी बोलताना बच्चू कडू यांनी सरकारवर टीका केली.

बच्चू कडू म्हणाले, सरकारच्या चुकीच्या धोरणामुळे शेतकऱ्यांना आत्महत्या करावी लागत आहे. आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांमध्ये हिंदूंचीच संख्या जास्त आहे. तरीही केंद्रातील आणि राज्यातील हिंदूत्ववादी सरकारला शेतकऱ्यांचा कळवळा का नाही, हा प्रश्न आहे. आम्ही शेतकरी, शेतमजूर, मेंढपाळांच्या प्रश्नांसाठी रस्त्यावर उतरलो आहोत. आंदोलनाची ही आमची पहिलीच वेळ नाही. आमचा जन्मच आंदोलनासाठी झाला आहे. पदावर असो किंवा नसो, आम्ही आमची सर्वसामान्यांना न्याय मिळवून देण्यासाठी संघषार्ची भूमिका सोडणार नाही. सरकारने आमच्या मागण्यांची दखल घ्यावी, पोलिसांनी आंदोलकांची अडवणूक करू नये, अशी आमची अपेक्षा असल्याचे बच्चू कडू म्हणाले.

राज्यातील मेंढपाळ आपल्या न्याय मागणीकरिता सरकारचे उंबरठे झिजवित असताना त्यांच्या मागण्यांच्या संबधात मुख्यमंत्री कुठलेही ठोस पाऊल उचलत नाहीत. शेतकरी व मेंढपाळांसाठी हे आंदोलन करण्यात येत आहे. सोयाबीन, तूर, कापसाचे भाव कोसळले आहेत. दुसरीकडे बियाणे, रासायनिक खते, शेणखताचे भाव वाढत जात आहे. अशी परिस्थिती असताना शेतकऱ्यांनी आपल्या कुटूंबाचा उदरनिर्वाह कसा चालवायचा? असा सवालही कडू यांनी यावेळी सरकारला विचारला आहे.

येथील संत गाडगेबाबा मैदानावरून मोचार्ला सुरूवात झाली. मेंढपाळाच्या वेशात घोड्यांवर स्वार होऊन बच्चू कडू आणि महादेव जानकर हे विभागीय आयुक्त कार्यालयावर पोहचले. मोर्चादरम्यान कडक पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. मोर्चात शेळ्या, मेंढ्या आणि घोड्यांसह शेकडो आंदोलक सहभागी झाले होते.



राज्य सरकारने विधानसभा निवडणूकीच्या काळात घोषीत केलेली सरसकट कर्जमाफी शेतकऱ्यांना तातडीने मिळावी, चराईकरिता परराज्यातून येणाऱ्या मेंढपाळांवर बंदी घालण्यात यावी अश्या अनेक मागण्या यावेळी ‘वाडा आंदोलना’तून करण्यात आल्या आहेत.

## देशमुख हत्याकांड प्रकरणी राज्यातील ग्रामपंचायतीचा बंद यशस्वी

**माढा (कटूसत्य वृत्त)**:- मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येला एक महिना पूर्ण झाल्यामुळे दोषीवर कडक कारवाई करावी व सरपंच, ग्रामपंचायत सदस्य व कर्मचारी संरक्षण कायदा करावा या मागणीसाठी अखिल भारतीय सरपंच परिषदेच्या वतीने एक दिवस ग्रामपंचायत बंद करण्याच्या आंदोलनाला गुरुवारी (दि.९) राज्यातील अनेक जिल्ह्यांतील बहुतांश सर्व ग्रामपंचायतीने बंद पाळून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

राज्यातील सुमारे १५००० ग्रामपंचायतीमध्ये स्वर्गीय सरपंच संतोष देशमुख यांना श्रद्धांजली वाहून ग्रामपंचायत काम बंद आंदोलन करण्यात आले असल्याची माहिती सरपंच परिषदेचे अध्यक्ष जयंत पाटील यांनी दिली.

सोलापूर जिल्ह्यातील माढा तालुक्यातील विविध




ग्रामपंचायतीने बंदमध्ये सहभाग घेतला. भोसरे व चोभेपिंपरी ग्रामपंचायत बंद केली असल्याचे त्यांनी सांगितले. ते म्हणाले की, राज्यातील सरपंच, उपसरपंच, कर्मचारी काही गावातील गावगुंडापासून भयभीत झालेले आहेत. समाजसेवा करताना अनेकजण यांच्या दबावाखाली काम करत आहेत. तेलंगणा व राजस्थान मधील न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे सरपंचाच्या फियार्दीनुसार शासकीय कामातील अडथळ्याचा गुन्हा गावगुंडावर दाखल करावा.

यावेळी जयंत पाटील यांनी शासनाकडे विविध मागण्या केल्या. त्यात सरपंच व ग्रामपंचायत कर्मचारी यांच्या संरक्षणासाठी कायदा असावा, ग्रामसभेला काही ठिकाणी गोंधळाची परिस्थिती निर्माण होते यामुळे प्रत्येक ग्रामसभेला पोलिस संरक्षण असावे, सरपंच संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्याला फाशी देण्यात यावी, संतोष देशमुख यांच्या कुटुंबातील एकाला शासकीय नोकरी देण्यात यावी तसेच त्यांचे गावामध्ये स्मारक उभा करण्यात यावे, सरपंचाला भविष्यात सुरक्षितता लाभण्यासाठी त्यांना पेन्शन योजना तसेच त्यांना विमा संरक्षण शासनातर्फे देण्यात यावे, ग्रामसभा ही सर्व ग्रामस्थांसाठी खुली असते त्यावेळेस सर्व ग्रामस्थ तेथे सहभाग घेतात यामुळे ग्रामपंचायतीच्या मासिक मीटिंगमध्ये गावातील लोकांना कायद्याने प्रवेश बंद असावा या मागण्यांचा समावेश होता.

## अकलूज येथे जिल्हा वार्षिक क्रीडा, सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त)**:-आयुक्त तथा संचालक नगरपरिषद प्रशासन संचालनालय व जिल्हा सहआयुक्त नगरपरिषद प्रशासन यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हास्तरीय नगरपरिषद,नगरपंचायत जिल्हा वार्षिक क्रीडा व सांस्कृतिक महोत्सव 2024-25 चे अकलूज येथे दि. 10 ते 12 जानेवारी 2025 या कालावधीत आयोजन करण्यात आले असल्याची माहिती जिल्हा सह आयुक्त श्रीमती वीणा पवार यांनी दिली.

या महोत्सवात सोलापूर जिल्हयातील 17 नगरपरिषदा, नगरपंचायती व जिल्हा सहआयुक्त कार्यालय अशी एकूण 18 कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी सहभागी होऊन आपले क्रीडा तसेच सांस्कृतिक क्षेत्रातील नैपुण्य दाखविणार आहेत. या महोत्सवाचे यंदाचे यजमानपद अकलूज नगरपरिषदेला मिळाले असून विजयसिंह मोहिते -पाटील क्रीडा संकुल, अकलूज येथे शुक्रवार दि 10 जानेवारी 2025 रोजी सकाळी 9.00 वा जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या अध्यक्षतेखाली व नगरपरिषद प्रशासन, पुणे विभागाच्या सह आयुक्त श्रीमती पूनम (पान 2 वर..)

## प्रशासकीय इमारत परिसरात 11 जानेवारी रोजी स्वच्छता मोहीम राबवली जाणार

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त)**:- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सात जानेवारी 2025 रोजी राज्यातील सर्व अधिकारी यांना शंभर दिवस उद्दिष्ट प्रति बाबत सात कलमी कार्यक्रम देण्यात आलेला आहे त्या अनुषंगाने जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशासकीय इमारतीमधील विविध विभागाच्या अधिकाऱ्यांनी एकत्रित येऊन आपले कार्यालय व आपला कार्यालय परिसर स्वच्छ ठेवण्याच्या अनुषंगाने जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय येथे सर्व विभाग प्रमुखांची नियोजन बैठक उपजिल्हाधिकारी तथा भूसंपादन अधिकारी संतोषकुमार देशमुख व अन्नधान्य वितरण अधिकारी ओंकार पडोळे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.



या स्वच्छता नियोजन बैठकीस जिल्हा उपनिबंधक किरण गायकवाड, जिल्हा माहिती अधिकारी सुनील सोनटक्के, जिल्हा ग्राहक मंच न्यायालयाचे प्रबंधक प्रशांत तावडे, उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या सहसंचालक नलिनी टेंभेकर, नगर भूमापन संचालक गजानन पोळ, भूजलचे वरिष्ठ भूवैज्ञानिक डॉक्टर मुस्ताक शेख, अन्न औषध प्रशासनाचे सहाय्यक आयुक्त एस. डी. जिंतूरकर, कृषी विभागाचे तंत्र अधिकारी एस. बी. देशमुख, भूसंपादन क्रमांक 11 चे सहाय्यक महसूल अधिकारी बी. व्ही. वाघ नेहरू युवा केंद्राचे सुभाष चव्हाण, मत्स्य व्यवसाय विभागाचे राजेश पाटील, उपविभागीय अधिकारी सोलापूर ग्रामीण पोलीस निरीक्षक जी. ए. बिराजदार, सरांनी बांधकाम विभागाचे सहाय्यक अभियंता विशाल लेंगरे आदी उपस्थित होते.

उपजिल्हाधिकारी देशमुख यांनी मुख्यमंत्री महोदय यांनी शंभर दिवस उद्दिष्ट पूर्ती च्या अनुषंगाने विभाग कार्यालयाचे वेबसाईट अद्यावत करणे, इज ऑफ लिविंग संकल्पना काम करणे, शासकीय कार्यालय स्वच्छता मोहीम राबवणे, नागरिकांच्या तक्रारी प्रलंबित प्रकरणी निकाली काढणे, उद्योजकांना त्रास होणार नाही याची काळजी घेणे, शासनाच्या महत्त्वाच्या प्रकल्पांना भेटी देणे शासकीय कार्यालयात येणाऱ्या नागरिकांना सोयी सुविधा उपलब्ध करून देणे हा सात कलमी कार्यक्रम राज्यातील सर्व अधिकारी यांना देण्यात आलेला आहे. त्याच पार्श्वभूमीवर या प्रशासकीय इमारतीमधील सर्व शासकीय विभाग प्रमुख अधिकारी कर्मचारी यांनी एकत्रित येऊन या इमारत परिसरात स्वच्छता मोहीम राबवण्याचा निर्णय घेतला असून या अनुषंगाने दिनांक 11 जानेवारी 2025 रोजी सकाळी आठ ते दहा या कालावधीत विशेष स्वच्छता मोहीम राबवली जाणार असून सर्व अधिकारी कर्मचारी यांनी या मोहिमेत सहभागी होण्याचे आवाहन त्यांनी केले.

या प्रशासकीय इमारतीमध्ये व परिसरात उच्च व तंत्र शिक्षण विभाग जिल्हा माहिती कार्यालय सोलापूर ग्रामीण उपविभागीय अधिकारी कार्यालय नगर भूमापन विभाग अन्न औषध प्रशासन नागरी समूह अन्नधान्य वितरण अधिकारी कृषी विभाग मत्स्य व्यवसाय वरिष्ठ भूवैज्ञानिक जिल्हा उपनिबंधक प्रकल्प संचालक निर्वाह केंद्र हे विभाग कार्यरत आहेत. या सर्व कार्यालया अंतर्गत जवळपास 25 अधिकारी व 160 कर्मचारी कामकाज करत आहे. परंतु या इमारत परिसरात खूप अस्वच्छता निर्माण झालेली असून इमारतीमध्ये अस्वच्छता सर्वत्र पसरलेली (पान 2 वर..)

## यात्रा कालावधीमध्ये अन्न सुरक्षेच्या दृष्टीने दक्षता घ्यावी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त)**:- सोलापूरचे ग्रामदैवत श्री सिध्देश्वर यात्रा 12 जानेवारी पासुन सुरू होत आहे. तरी सदर यात्रा कालावधीमध्ये अन्न व औषध प्रशासनाने दिलेल्या सूचनांचे पालन करुन अन्न सुरक्षेच्या दृष्टीने ग्राहकांना स्वच्छ, निर्भेळ, ताजे अन्न पदार्थांची विक्री करण्यात यावी. यात्रा कालावधीत अन्न पदार्थ व इतर खाद्यपदार्थ खरेदी करताना परवानाधारक / नोंदणीधारक आस्थापना कडूनच खरेदी करावेत, अन्न पदार्थ हे स्वच्छ, निर्भेळ, आरोग्यदायी असावेत असेच अन्नपदार्थ उपलब्ध करून देण्यात यावेत, तयार अन्नपदार्थ हे नेहमी झाकून ठेवलेले असावेत जेणेकरून त्यावर धूळ, कीटक, माशा बसणार नाहीत व अन्न पदार्थ दुषित होणार नाही याची काळजी घ्यावी. अन्न पदार्थ बनवताना स्वच्छ वातावरणात व स्वच्छ जागेमध्ये तयार करावेत. पॅकबंद असलेलेच अन्नपदार्थ पदार्थ विकत घ्यावेत. सदर पॅकेटवर उत्पादकाचा तपशील, उत्पादन दिनांक, बेस्ट बिफोर, मुदतबाह्य दिनांक, बॅच नंबर इत्यादी तपासून खरेदी करावेत. अन्न पदार्थ बनविण्यासाठी पिण्यायोग्य पाण्याचाच वापर करावा. उघड्यावरील व माशा, कीटक, धूळ बसलेले अन्न पदार्थाचे सेवन करण्यात येऊ नये. हॉटेल, रेस्टॉरंट, नाश्ता सेंटर येथे अन्न पदार्थ बनविण्यासाठी चांगल्या प्रतीचेच खाद्यतेलाचा वापर करावा. खाद्यतेल हे 2-3 वेळाचा अन्नपदार्थ तळण्यासाठी वापरावे. शिळे, बुरशी आलेले, विटलेले अन्न पदाथार्चे वितरण करू नये वा सेवन करू नये. अन्न (पान 2 वर..)

## सोलापूर जिल्हा दूध संघ 'एनडीडीबी' कडे हस्तांतराचा ठराव झाला

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- आर्थिक तोटा तर दररोजच वाढतोय, जागांची विक्री केली तरच कजार्चा बोजा कमी होणार आहे. जागा तर विक्री होत नसताना संघ 'एनडीडीबी'कडे हस्तांतर करण्याचा ठराव संचालक मंडळाने घेतला.

तत्पूर्वी मुख्यमंत्री व दुग्धविकास मंत्र्यांना भेटून वस्तुनिष्ठ पत्र देण्याचे सोलापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ संचालक मंडळाच्या बैठकीत ठरविण्यात आले. मोठ्या आर्थिक अडचणीत व ५० कोटींपर्यंत कर्ज असलेल्या सोलापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघाच्या संचालक मंडळाची तीन महिन्यांनंतर ७ जानेवारी रोजी बैठक झाली. या बैठकीत प्रामुख्याने संघावर असलेल्या कर्जातून मार्ग काढण्यावर



तसेच संघ 'एनडीडीबी'कडे वर्ग करण्याबाबत चर्चा झाली. संघाला होत असलेला तोटा, जमीन विक्री होत नसल्याने कर्ज भरण्यासाठी येणाऱ्या अडचणीवर चर्चा करताना 'एनडीडीबी'कडे दूध संघ वर्ग करण्यावर एकमत झाले.

दूध संघ 'एनडीडीबी'कडे वर्ग करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व दुग्ध विकासमंत्री अतुल सावे यांना भेटून दूध संघाच्या परिस्थितीचे वस्तुनिष्ठ पत्र संचालक मंडळ शिष्टमंडळाने देण्यात येणार आहे.

### सुजित पाटलांचा राजीनामा मंजूर

सोलापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघाचे प्रभारी व्यवस्थापकीय संचालक सुजित पाटील यांच्या कारभारावर अगोदरच संचालक मंडळ नाराज आहेत. काही संचालकांनी तशी नाराजीही संचालक मंडळाच्या बैठकीत व्यक्त केली होती. कारभारावर सुधारणा होण्याऐवजी अधिकच बिघाड सुरू झाल्यानंतर पाटील यांनी राजीनामा दिला. तर राजीनामात मंगळवारी झालेल्या संचालक मंडळाच्या बैठकीत मंजूर करण्यात आल्याचे व्हाइस चेअरमन दीपक माळी व संचालक औदुंबर वाडदेकर यांनी सांगितले. मात्र, खचार्चा हिशेब व पयार्यी व्यक्ती मिळेपर्यंत पाटील यांना कार्यमुक्त करण्यात येऊ नये, असेही संचालक मंडळाच्या बैठकीत ठरले असल्याचे सांगण्यात आले. (पान 2 वर..)

## जिजाऊ जयंतीनिमित्त झेडपी मराठा सेवा संघ शाखेतर्फे विविध कार्यक्रम

**सोलापूर (कटूसत्य वृत्त)**:- जिल्हा परिषद मराठा सेवा संघ शाखेतर्फे राष्ट्रमाता जिजाऊ माँसाहेब यांच्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्याचे बैठकीत ठरले.

राष्ट्रमाता जिजाऊ माँसाहेब यांची 12 जानेवारी रोजी जयंती आहे त्यानिमीत्ताने दिनांक 11 जानेवारी वार शनिवार रोजी सकाळी 10.00 वा. जिल्हा परिषदेच्या सभागृहामध्ये रक्तदान शिबिर आयोजित करण्यात येणार आहे. त्यानंतर जिल्हा परिषद मधील सर्व जिजाऊ - सावित्री लेकींचा सन्मान करण्यात येणार आहे. मा. जिल्हाधिकारी छत्रपती संभाजीनगर दिलीप स्वामी यांच्याहस्ते , मा. मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांचे अध्यक्षतेखाली, प्रकल्प संचालक जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा डॉ. सुधीर ठोंबरे व मराठा सेवा संघ जिल्हाध्यक्ष डॉ.जी. के. देशमुख यांचे प्रमुख उपस्थितीत व सर्व अधिकारी व कर्मचारी यांच्या उपस्थितीत कर्तृत्वान महिलांचा सत्कार करण्यांत



येणार आहे. यामध्ये कर्तृत्वान महिला म्हणून लेखाधिकारी रुपाली रोकडे, बाल विकास प्रकल्प अधिकारी रेश्मा पठाण, वैद्यकिय अधिकारी डॉ अनिसा तांबोळी, गट शिक्षणाधिकारी जयश्री सुतार, प्रशासन अधिकारी पुष्पा भड, शाखा अभियंता उषा भोसले, कनिष्ठ अभियंता सना नदाफ, विस्तार अधिकारी (पं) स्वास्ती गायकवाड, विस्तार अधिकारी (कृषि) रेखा डोके, मुख्याध्यापिका ललिता मोरे, सहशिक्षिका उर्मिला माने, जिल्हा लेखा व्यवस्थापक वैशाली थोरात, जिल्हा पाणी गुणवत्ता सल्लागार दिपाली व्हटे -पवळे, ग्राम पंचायत अधिकारी मंजुश्री कारंडे,वरिष्ठ सहाय्यक वंदना जाधव, कनिष्ठ सहाय्यक आरती माढेकर, आरोग्य सेविका मैना माने, परिचर वर्षा औदुर्ती, सविता काळे यांचा सन्मान करण्यात येणार आहे.

तसेच रक्तदान शिबीर सकाळी 10 ते 5 या वेळेत करण्यात येणार असल्याची माहिती अविनाश गोडसे, अध्यक्ष , मराठा सेवा संघ शाखा जि प यांनी दिली. यावेळी सचिन जाधव, सचिन चव्हाण, विकास भांगे,चेतन भोसले, वासुदेव घाडगे,विशाल घोगरे,रणजीत गव्हाणे, विठ्ठल मलपे, सचिन पवार, रोहीत घुले, संतोष शिंदे अभिजीत निचळ,भूषण काळे, प्रकाश शेंडगे, सजेर्राव गाडेकर, उमेश खंडागळे,सचिन खराडे, प्रसाद काशीद, संतोष नीळ, जयंत पाटील, महेंद्र माने, सचिन लामकाने, अनिल पाटील, गोपाल शिंदे, संजय चव्हाण, व्ही. आर. कदम आश्विनी सातपुते, अनिता भुसारे , अनुपमा पडवळे, भारती धुमाळ,सविता मिसाळ, ज्योस्ना साठे, प्रतिक्षा गोडसे, उषा भोसले उपस्थित होते.

## सोलापूर जिल्ह्यात एकाच दिवशी दोन भीषण अपघात, तीन ठार, दोन जखमी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त)**:- अकलूज रोड देव वकील वस्ती जवळ पहाटे साडेपाच ते पावणे सहा या दरम्यान अज्ञात वाहनाच्या जोरदार धडकेने दोन जण जागीच ठार झाले तर एक जण गंभीर जखमी झाल्याची घटना घडली.

पहाटे साडेपाच वाजेच्या सुमारास चांगदेव किसन सर्जे (५५) आणि दिलीप पंढरी कांबळे (४५) हे दोघेही आपल्या मित्रासोबत रोडवर फिरत असताना सिताराम महाराज आर्ट्स या दुकाना जवळ, देव वकील वस्तीजवळ पाठीमागून आलेल्या अज्ञात वाहनाने त्यांना जोरदार धडक दिली.

या अपघातात चांगदेव सर्जे आणि दिलीप कांबळे हे जागीच ठार झाले, तर शंकर बळीबा देशमुख (६१) गंभीर जखमी झाले. त्यांना तात्काळ अकलूज येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले. याबाबत चैतन्य मल्हारी सर्जे यांनी माळशिरस पोलिसात तक्रार दाखल केली आहे. पुढील तपास माळशिरस पोलीस निरीक्षक नारायण पवार साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभारी अधिकारी स पो नि जानकर साहेब करीत आहेत. तर मोहोळ येथील यावली गावाजवळ सोलापूर-पुणे महामार्गावर शिक्षक राजेंद्र सुखदेव कारंडे (५७) आणि विजय नामदेव राऊत (६५) हे स्कूटीवर शाळेच्या कामासाठी जात असताना, त्यांना मालट्रकने पाठीमागून धडक दिली.

राजेंद्र कारंडे यांचा घटनास्थळी मृत्यू झाला, तर विजय राऊत हे जखमी झाले. जखमींना तात्काळ सोलापूर येथे रुग्णालयात दाखल करण्यात आले. अपघातामुळे महामार्गावर काही वेळ वाहतूक अडचणीत आली होती.

या घटनेची माहिती माळशिरस आणि मोहोळ पोलिसांना देण्यात आली आहे. पोलिसांनी तपास सुरू केला असून, संबंधित वाहनचालकांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

## संपादकीय

# सात कलमी सुशासन

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दोन दिवसांपूर्वी मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर राज्यातील सर्व प्रशासकीय अधिकार्यांशी संवाद साधताना राज्यातील सामान्य नागरिकांचे जीवन सुकर व्हावे यासाठी एक 'सात कलमी' कार्यक्रम निश्चित करून दिला आहे.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारने काही वर्षांपूर्वी 'इज ऑफ डुइंग बिझनेस' ही संकल्पना आणली होती. त्याच आधारे महाराष्ट्रात 'इज ऑफ लिव्हिंग' या संकल्पनेच्या आधारे राज्यातील सामान्य नागरिकांचे जीवन सुकर व्हावे यासाठी मुख्यमंत्र्यांनी राज्यातील प्रशासनाला ही सुशासनाची सप्तपदी आखून दिली आहे. या सप्तपदीतील किंवा या सात कलमी कार्यक्रमातील अनेक कलमे जरी सर्वसाधारण आणि खूपच प्राथमिक या गटात मोडणारी असली, तरी राज्यात अद्यापही या विषयावर चर्चा करावी लागत आहे हा विषय या निमित्ताने समोर आला आहे. उदाहरणार्थ, शासकीय कार्यामध्ये स्वच्छता ठेवा आणि सर्वसामान्य नागरिकांसाठी स्वच्छ पेयजलाची व्यवस्था करा, अशा प्रकारच्या सूचना आजही मुख्यमंत्र्यांकडून प्रशासकीय अधिकार्यांना दिल्या जात आहेत हे महत्त्वाचे आहे. विविध कामांसाठी शासकीय कार्यालयात खेटा मारणाया लोकांचा बराच काळ या कार्यालयातच व्यतीत होत असतो. पण या काळामध्ये त्यांच्यासाठी योग्य स्वच्छतागृहांची किंवा स्वच्छ पाण्याची व्यवस्था नसते हे एक उघड सत्य आहे. नागरिकांची कामे करणाया अधिकार्यांसाठी वातानुकूलित कार्यालयात बाटलीबंद स्वच्छ पाण्याची आणि स्वच्छ स्वच्छतागृहांची सोय जरी केली जात असली, तरी ज्या लोकांसाठी हे अधिकारी आहेत त्या सर्वसामान्य नागरिकांसाठी मात्र या सोयी उपलब्ध करून देण्याकडे दुर्लक्ष झाले आहे. आजही विविध शासकीय कार्यालयांमधील स्वच्छतागृहे, पाण्याची व्यवस्था किंवा जर बहूमजली इमारत असेल तर लिफ्टची व्यवस्था नादुरुस्त असते हे सत्यही नाकारता येत नाही. शासकीय कार्यालयात ज्या कामासाठी एखादी सामान्य व्यक्ती येते ते काम त्याला सहजपणे पूर्ण करता यावे अशी व्यवस्था शासकीय कार्यालयामध्ये निर्माण व्हायला हवी अशी अपेक्षा या निमित्ताने मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केली आहे. तरी शेवटी नोकरशाहीच्या माध्यमातून हा सात कलमी कार्यक्रम कशा प्रकारे राबवण्यात येणार आहे यावरच या योजनेचे यश अवलंबून राहणार आहे. मुख्यमंत्र्यांनी या कार्यक्रमांमध्ये ज्या सूचना केल्या आहेत त्यामध्ये सरकारी कार्यालयांच्या वेबसाइट अद्ययावत करा अशी एक सूचना आहे. डिजिटल इंडियामध्ये अनेक सरकारी कार्यालय किंवा सरकारी उपक्रम यांच्या वेबसाइट व्यवस्थित चालत नाहीत असाच आजवरचा अनुभव आहे. वेबसाइटवर जी माहिती उपलब्ध व्हायला हवी ती योग्य प्रकारे उपलब्ध होत नसल्यामुळेच सर्वसामान्य नागरिकांना शासकीय कार्यालयांचे खेटे मारावे लागतात. राज्यातील सर्व विभाग आणि कार्यालयांची संकेतस्थळं जर तातडीने अपडेट करण्यात आली आणि सर्वसामान्य नागरिकांना ती वापरता येतील अशा प्रकारे सोपी करण्यात आली तर शासकीय कार्यालयांमध्ये न जातासुद्धा सामान्य नागरिकांना कामे करणे सोपे जाणार आहे.

गाव किंवा शहर पातळीवर नागरिकांची कामे व्यवस्थित होत नसल्यामुळेच या नागरिकांना मंत्रालयाचा दरवाजाही ठोठावा लागतो. त्यामुळे मंत्रालयातील गदीर्ही वाढत आहे. ही गर्दी जर कमी करायची असेल तर गाव आणि शहर पातळीवर शासकीय कार्यालयांमध्ये सर्वसामान्य नागरिकांची कामे वेळेत आणि व्यवस्थित पूर्ण होण्याची गरज आहे हे लक्षात घेऊनच मुख्यमंत्र्यांनी हा सात कलमी कार्यक्रम समोर ठेवला आहे. मुख्यमंत्र्यांनी गेल्याच आठवड्यात आपल्या मंत्रिमंडळातील मंत्र्यांनासुद्धा शंभर दिवसाच्या कामाचा आराखडा करण्याचा आदेश दिला आहे. या रोड मॅपप्रमाणे नोकरशाहीने काम करावे आणि प्राधान्यक्रम ठरवून सामान्य नागरिकांची महत्त्वाची कामे मार्गी लावावीत अशी मुख्यमंत्र्यांची अपेक्षा आहे. या देशातील केंद्रीय पातळीवर किंवा इतर कोणत्याही राज्याच्या पातळीवर जेव्हा एखादी योजना आखली जाते तेव्हा ती कागदावर नेहमीच आदर्श असते. पण अंमलबजावणी पातळीवर मात्र अनेक समस्या निर्माण होतात; पण आता या सात कलमी शासनाच्या योजनेबाबत मात्र मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वतः लक्ष घालून या कलमांचे काटेकोर पालन होईल हे बघण्याची गरज आहे. ज्या प्रकारे मंत्रिमंडळातील सर्व मंत्र्यांचे प्रगती पुस्तक दर ठराविक कालावधीनंतर तपासले जाणार आहे त्याच प्रकारे नोकरशाहीची कार्यक्षमता तपासण्याचे कामही करावे लागणार आहे. सरकारने एखादा निर्णय घेतला तर त्याची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी नोकरशाहीवरच असते. आजपर्यंतच्या लालफितीच्या आणि भ्रष्टाचारी कारभाराचा अनुभव असणाया नोकरशाहीला आता अशा प्रकारचे नवे बदल स्वीकारणे अवघडच जाणार आहे. म्हणूनच सरकारने ठरवून दिलेल्या कार्यक्रमाची अंमलबजावणी नोकरशाहीकडून कशा प्रकारे आणि किती कार्यक्षमतेने केले जाते याचेही ऑडिट ठराविक कालावधीनंतर करून घेण्याची गरज आहे. सरकारी काम आणि सहा महिने थांब ही अनेक वर्षांपूर्वी प्रचलित झालेली म्हण जर अजूनही वापरली जात असेल, तर सरकारी कार्यालयीन पातळीवर कार्यक्षमतेबाबत बरीच मोठी गडबड आहे हेसुद्धा मान्य करावे लागते. सरकारच्या अनेक चांगल्या योजना केवळ नोकरशाहीच्या निरुत्साहीपणामुळे आणि नाराजीमुळे यशस्वी होऊ शकत नाहीत, असे अनेक वेळा सिद्ध झाले आहे. या सात कलमी सुशासन योजनेबाबत तसे काही होणार नाही याची खबरदारी सरकारला घ्यावीच लागणार आहे. सध्या कोणत्याही खासगी उपक्रमामध्ये किंवा कंपनीमध्ये सर्वसामान्य ग्राहकाचे ज्या प्रकारे स्वागत केले जाते आणि ज्या कार्यक्षमतेची सेवा त्याला दिली जाते तशीच कार्यक्षमता तशीच सेवा जोपर्यंत सरकारी कार्यालयात सर्वसामान्य नागरिकाला उपलब्ध होणार नाही तोपर्यंत हे चित्र बदलण्याची शक्यता कमीच आहे.

पान १ वरून

## प्रशासकीय इमारत परिसरात...

आहे त्या अनुषंगाने सर्व कार्यालय प्रमुखांनी एकत्रित येऊन सर्वप्रथम आपापले कार्यालय स्वच्छ करण्याची मोहीम हाती घेण्यात येणार आहे.

या स्वच्छता मोहिमेचा शुभारंभ दिनांक 11 जानेवारी 2025 रोजी सकाळी आठ ते दहा या वेळेत प्रशासकीय इमारत परिसर मोहिमेची स्वच्छता करून करण्यात येणार आहे. या मोहिमेत सर्व अधिकारी कर्मचारी 100% उपस्थित राहणार आहेत. यापुढील काळात प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या शनिवारी व चौथ्या शनिवारी परिसर स्वच्छता मोहीम राबविण्याबाबत सर्वांचे एकमत झालेले आहे. परिसर स्वच्छ केल्यानंतर आपापल्या कार्यालयात प्रत्येक विभाग प्रमुखांनी त्यांची कार्यालये स्वच्छ व नीटनेटकी करून घेण्याचे ठरले. तसेच कार्यालयाबाहेर व्यवस्थित स्वच्छता ठेवून कार्यालयात येणाऱ्या नागरिकांसाठी बसण्यासाठी बैठक व्यवस्था करण्यात येणार आहे. तसेच आलेल्या नागरिकांची कामे वेळेत व गतीने होतील यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत.

## लोकमंगल कृषी महाविद्यालयात रेशीम कोष उत्पादन तंत्रज्ञान प्रशिक्षण कार्यशाळा संपन्न









**सोलापूर (कटूसत्य वृत्त)**:– श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान संचलित आणि महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी संलग्नित लोकमंगल कृषी महाविद्यालय वडाळा येथे दिनांक ०४ जानेवारी रोजी चतुर्थ वषार्तील विद्याथ्यार्मार्फत शेतकऱ्यांसाठी रेशीम कोष उत्पादन तंत्रज्ञान कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. सदरील कार्यशाळेच्या उद्घाटन कार्यक्रम प्रसंगी अध्यक्ष म्हणून लोकमंगल कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अमोल शिंदे हे लाभले. उपस्थित शेतकरी तथा विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी नान्नज येथील रेशीम कोष निर्मितीमधील युवा उद्योजक श्री. विभुते हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. सदरील कार्यशाळेची सुरुवात उपस्थित मान्यवर तथा शेतकरी बांधव तसेच महिला शेतकरी यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून करण्यात आली. यानंतर उपस्थितांना लोकमंगल शैक्षणिक संकुल, संलग्नित महाविद्यालये आणि त्यातील विद्यार्थी केंद्रित विविध उपक्रम तसेच रेशीम कोष उत्पादन तंत्रज्ञान कार्यशाळा याबाबतची ओळख प्रास्ताविकाच्या माध्यमातून कृषी अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा. नवनाथ गोसावी यांनी करून दिली. प्रास्ताविकानंतर कार्यक्रमाला लाभलेले प्रमुख पाहुणे श्री. विभुते यांचा परिचय लोकमंगल कृषी महाविद्यालयातील कीटक शास्त्र विभाग प्रमुख प्राध्यापिका खोबरे मॅडम यांनी सर्वांना करून दिला. स्वतचं व्यवसाय सुरू असताना देखील नवीन काही तरी करून कमी जागेतून जास्त उत्पादन मिळवण्याची आणि गेली २ वर्षे ह्या क्षेत्रात उलेखनिय कामगिरी करणाऱ्या अशा युवा शेतकऱ्याचा सन्मान कार्यक्रमाच्या अध्यक्षांच्या हस्ते शाल, भेटवस्तू आणि पुष्पगुच्छ देऊन करण्यात आला. या समवेत त्यांच्या यशस्वी प्रवासातील त्यांचे सोबती गणराज मुळे यांचा देखील सन्मान याप्रसंगी भेटवस्तू व शाल देऊन करण्यात आला. सदरील कार्यशाळेत सर्वप्रथम चित्रफितीच्या माध्यमातून अंतिम वर्षातील विद्यार्थी प्रतिनिधी कु. दिव्या कोरेकर हिने तुती लागवड तसेच केशव जगदाळे ह्याने रेशीम कीटक संगोपन आणि मीनल कस्तुरे हिने रेशीम शेती करताना मिळणारे सरकारी अनुदान यांनी लोकमंगल कृषी महाविद्यालयात मॉड्युल अंतर्गत यशस्वीरित्या सुरू असलेल्या रेशीम कोष उत्पादन याची शास्त्रोक्त माहिती दिली. यामध्ये रेशीम शेती मधील कमी जागा कमी वेळ यातून मिळणारे अधिक उत्पन्न तसेच रेशीम शेती ची वाढती मागणी भविष्यातील त्याची मागणी तसेच एक घरगुती शेतीला जोड धंदा हा कसा ठरू शकतो यावर त्यांनी प्रकाश टाकला. लोकमंगल कृषी महाविद्यालयातील विद्यार्थ्यां मार्फत सुरू असणाऱ्या या रेशीम कोश उत्पादन प्रकल्पाविषयी त्यांनी सविस्तर अशी माहिती विशद केली. यानंतर कार्यशाळेला लाभलेले प्रमुख पाहुणे श्री. विभुते यांनी रेशीम शेती प्रकल्प उभारणीमध्ये त्यांचा अनुभव, आजवरचा जीवन प्रवास आणि रेशीम शेतीमधील व्यावसायिक भविष्य याबाबत भाष्य केले. चीन पाठोपाठ भारताने केलेली प्रगती याविषयी त्यांनी मार्गदर्शन केले यावेळी रेशीम शेतीविषयी असलेल्या शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांना देखील त्यांनी उत्तरे देऊन त्यांच्या शंकांचे समाधान केले. यानंतर शेतकरी मनोगतामध्ये काटी येथील रेशीम शेती नुकतीच सुरू केलेले शेतकरी प्रदीप साळुंखे आणि उले येथील प्रगतशील महिला शेतकरी सौ.दुर्गा खरतमल यांनी लोकमंगल कृषी महाविद्यालय मार्फत आयोजित या रेशीम शेती प्रशिक्षण कार्यक्रमाचे कौतुक केले. भविष्यातील शेतकऱ्यांना असलेल्या संधी, महिलांना असणारे फायदे आणि कमी पाण्यावर चालणारी शेती अत्यावश्यक असल्याची या कार्यशाळेमुळे जाणीव झाल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. अध्यक्षीय मनोगतामध्ये आपले विचार मांडताना लोकमंगल कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अमोल शिंदे यांनी सर्वप्रथम शेळगाव, सांगवी, काटी, ऊळे आणि तामलवाडी येथून कार्यशाळेकरीता आवररजून सदरील कार्यशाळेत एकूण ६७ शेतकऱ्यांची उपस्थिती होती. यात मुख्यत्वे प्रगतशील महिला शेतकऱ्यांची उल्लेखनीय उपस्थिती होती.कार्यशाळेचा शेवट कु.वैष्णवी घोडके हिने उपस्थितांचे आभार मानून केला.यानंतर युनिट ला सर्वांनी भेट दिली व त्यांचे प्रश्न विचारताना विद्यार्थ्यांनी केलेल्या कामाचे कौतुक केले तसेच हा प्रकल्प फायदेशीर आहे असे मत व्यक्त केले त्यानंतर सर्वांनी भोजनाचा आस्वाद घेतला.

## प्रबोधन

# स्वप्ने साकारा प्रयत्नाने ! स्वप्ने साकाराया। मोठे बळ हवे

मनुष्य कोणाला म्हणावं? असा प्रश्न विचारला तर अनेक विद्वान लोक माणसाच्या अनेक व्याख्या करतील. 'मनुष्य हा समाजात राहाणारा प्राणी आहे.' अशी माणसाची व्याख्या समाजप्रेमी विद्वान करतील. 'अनेक सवयी ज्याला जडलेल्या असतात त्याला माणूस म्हणतात,' असं मानसशास्त्रज्ञ म्हणतील. टंल्ल२ ुं४ल्लर्ी ज्ञ्ुं३२ अशी व्याख्या करतील. सुप्रसिद्ध साहित्यकार वि. स. खांडेकर हे फार स्वप्नाळू विचारवंत होते. ते म्हणतात, 'भग्न स्वप्नांच्या तुकड्यांना कवटाळून बसण्यासाठी मनुष्य जन्माला आलेला नाही... एखादं स्वप्न पाहणं, फुलवणं, ते सत्यात उतरावं म्हणून धडपडणं, त्या धडपडीतला आनंद लुटणं आणि दुर्दैवाने ते स्वप्न भंगलंच, तर त्याच्या तुकड्यावरून रक्ताळलेल्या पायांनी दुसऱ्या स्वप्नामागे धावणं हा मानवी मनाचा धर्म आहे.' थोडक्यात 'स्वप्नामागे धावतो त्याला मनुष्य म्हणतात,' असं खांडेकरांना म्हणायचंय.

अलेक्झांडर दि ग्रेट, शिवाजी दि ग्रेट, अकबर दि ग्रेट, नेपोलियन दि ग्रेट अशी दिग्विजयी समरधुरंधर माणसं मोठी स्वप्नं पाहूनच मोठी झाली. 'स्वप्नं ही शुद्ध कल्पनाशक्तीची देणगी आहे,' हा प्रसिद्ध विचारवंत हेड्जचा विचार त्याचसाठी काहीसा अपुरा वाटतो. त्याऐवजी थोर पुरुषांची स्वप्नं हीच त्यांच्या कायाची रूपरेषा असते, असं म्हणणं अधिक योग्य होईल. त्याचबरोबर ह्या जगज्जेत्या व्यक्तींमध्ये जी जिद्द, चिकाटी आणि कष्टाळूपणा असतो, तो असाधारण असतो. त्यांनी पाहिलेली स्वप्नं उघड्या डोळ्यांनी, जागेपणी पाहिलेली असतात. डोळे मिटून झोपेत स्वप्नं पाहाणारे कधी जगज्जेते होऊ शकत नाहीत. स्वप्न मनात आणि काम वास्तवात, असंच थोरांचं वागणं असतं. कोणत्याही कामात जीव ओतला आणि संपूर्ण शक्ती एकवटली, की हमखास यश मिळतं, हाच ह्या थोरांचा जगाला संदेश असतो. जगज्जेत्यांच्या यादीत आता श्रीमंतांची नावंही घालावी लागतील. स्वप्नं पाहणं आणि ती साकार करणं, हा त्यांच्या हाताचा मळ असतो. ते रोज नवी स्वप्नं पाहातात, रोज वैभवाची नवी क्षितिजं पार करतात आणि रोज मनसोक्त सुखाची परमावधी गाठतात. त्यांच्या तुलनेने गरीब जगतात, ते जगणं नव्हे आणि ते पाहातात ती स्वप्नंही नव्हेत. श्रीमंत पाहातात ती सुखस्वप्नं, तर गरीब पाहातात ती दुःस्वप्नं! दुःस्वप्नं पाहाणाऱ्याचे प्राण क्षणोक्षणी कंठाशी येत असतात. गरिबांचं प्रत्येक स्वप्न वांझोटं असतं. जगप्रसिद्ध परीकथालेखक हॅन्स अँडरसनने लिहिलेली दि मॅच गर्ल ही कथा वाचकांच्या काळजाचा ठाव घेते. काड्याच्या पेट्या विकून नाताळ साजरा करू पाहाणारी दरिद्री मुलगी एकही काड्याची पेटी विकली न गेल्याने सारे लंडन शहर नाताळचा आनंद लुटत असताना उघड्यावर थंडीने गारठून मरते. मात्र मरताना ती एकेक काडी पेटवते. त्या प्रकाशात दिसणाऱ्या स्वप्नात तिला नवे कपडे, मिठाया आणि फुलबाजे दिसतात. अँडरसन, शोषणग्रस्त गरिबांच्या जीवनाला मृत्यूच्या दारातही स्वप्नाचं वरदान कसं लाभतं, तेच सांगतात. विचारवंत लेखक वि. स. खांडेकर हे मात्र मध्यमवगार्तील लोकांचे प्रतिनिधी होते. स्वतः त्यांचीच अनेक स्वप्नं भंगली होती आणि भंगलेल्या स्वप्नांवरून रक्तबंबाळ झालेल्या पावलांनी ते दुसऱ्या स्वप्नामागे धावत राहिले होते. धड गरीब नसणारी आणि धड श्रीमंत नसणारी त्यांच्यासारखी माणसं आपल्या स्वप्नपूतीर्साठी किती झटतात, कितीदा अपयशी होतात, पुन्हा उमेदीने उभी राहातात आणि त्यांच्यातील शंभरापैकी एखाद्यानेच कसं यश मिळवलेलं असतं, हे विदारक सत्य त्यांनी अनुभवलं होतं. जे नव्याण्णव टक्के अपयशी ठरले, त्यांचं दुःखही जाणलं, ते खांडेकरांनीच !

स्वप्न आणि वास्तव यांचा मेळ घालायचा असेल, तर लक्षात ठेवा–

भव्य दिव्य स्वप्नं । थोरांनी पाहिली
पृथ्वी धन्य झाली । साकारता ॥ १
स्वातंत्र्य समता । यांचे रम्य स्वप्न
आणले झटून । जगी त्यांनी ॥ २
थोरांची ती स्वप्नं । सदा आदरावी
त्यांची स्तुती गावी । सदोदित ॥ ३
गरीब पाहतो । भाकरीचे स्वप्न
भुकेने हैराण । सदा होतो ॥४
गरिबाचे जिणे । दुःस्वप्न ते एक
नाही सुटणूक । कधी त्याची ॥५
सामान्यांची स्वप्नं । मोठी फरपट
केली खटपट । वाया जाते ॥ ६
सामान्य बिचारे । स्वप्नामागे जाती
परत फिरती । पराभूत ॥ ७
स्वप्ने साकाराया। मोठे बळ हवे
जिद्दीचेही हवे। पाठबळ ॥८
कठोर तो यत्न । जगी जो करतो
स्वप्ना तो आणतो । आकारास ।। ९



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर-416012
92258 09071

## विदया विकास तंत्रनितेकन मध्ये वाचन संकल्प महाराष्ट्राचा अभियानास उस्फुर्त प्रतिसाद

**सोलापूर (कटुसत्य वृत्त )** सोलापूर येथील विदया विकास तंत्रानितेकन मध्ये वाचन संकल्प महाराष्ट्राचा अभियान सुरु आहे यामध्ये ग्रंथालय स्वच्छता, ग्रंथ प्रदर्शन, सामुहिक वाचन, संवाद लेखन, पुस्तक परिक्षण व कथा स्पर्धा आयोजित करून वाचन पंधरवडा साजरा करण्यात येत आहे. ग्रंथालयात यावेळी ग्रंथप्रदर्शन उदघाटना वेळी संस्थेचे संस्थापक सचिव अमोल (नाना) चव्हाण, कॅम्पस डायरेक्टर डॉ. अरुण गायकवाड, प्राचार्य डॉ. सुनीलदत्त कुलकर्णी, प्रथम वर्ष इनचार्ज डॉ एस एन चव्हाण, ग्रंथपाल श्री चंद्रकांत नवत्रे, विभाग प्रमुख प्रा. मनोज ढोबळे, प्रा. अनिल काळे, प्रा. जुबेर शेख, प्रा. सत्यशीला वामन, प्रा.



रेखा बिरादार व इतर प्राध्यापक उपस्थित होते. व्यक्तीमत्व विकास संवाद कौशल्य विकसित होण्यासाठी ग्रंथ प्रदर्शन व वाचन या सारखे उपक्रम राबविणे हि काळाची गरज आहे असे प्रतिपादन संस्थेचे संस्थापक सचिव अमोल (नाना) चव्हाण यांनी केले. वाचन संकल्प महाराष्ट्राचा अभिनव उपक्रम त्यानुसार पंधरा तारखेपर्यंत पंधरवडा साजरा होत असून ग्रंथालयातील वाचन कक्षात सामुहिक वाचन घेण्यात आले. विदयाथ्यार्ना निरंतर वाचनाची आवड निर्माण व्हावी यासाठी कौशल्य संवाद कार्यशाळा आयोजित करण्यात येणार आहे. त्याचबरोबर पुस्तक परीक्षण स्पर्धेमधील विजेत्यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येत आहे, अशी माहिती प्राचार्य डॉ सुनीलदत्त कुलकर्णी यांनी दिली. सदर कार्यक्रमासाठी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ . प्रा. जी के देशमुख, संस्थेचे संस्थापक सचिव अमोल (नाना) चव्हाण व संस्थेचे विश्वस्त श्री. मधुकर कटकधोंड यांचे मार्गदर्शन लाभले.

## अग्निशमन केंद्राला निधी देण्याची मागणी

### उपमुख्यमंत्री शिंदे यांच्याकडून आ. खरेंना सकारात्मक प्रतिसाद

**पोखरापूर : (कटूसत्य वृत्त) :–** मोहोळ नगरपरिषदेला मंजूर असलेल्या अग्निशमन केंद्र व वाहनाला तात्काळ निधी मिळण्याची मागणी उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्र्यांकडे मोहोळचे आमदार राजू खरे यांनी केली होती, त्यांच्या मागणीनुसार शासनाच्या जीआरला अनुसरून कार्यवाही करावी असा शेरा उपमुख्यमंत्र्यांनी पत्रावर दिला असून यामुळे अग्निशामक वाहनाला तत्काळ निधी मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. आमदार राजू खरे यांनी मंगळवारी मुंबई येथे उपमुख्यमंत्री तथा नगर विकास मंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेत मोहोळ विधानसभा मतदारसंघातील विविध प्रश्नांबाबत चर्चा केली.



मोहोळ नगरपरिषदेला मंजूर अग्निशमन केंद्र व वाहनासाठी तत्काळ निधी मिळण्याची मागणी केली. शासनाने अग्निशामक केंद्र व वाहनाला रु. १ कोटी ५९ लाथ एवढया रक्कमेची मान्यता दिली होती. त्यामधील ३९ लाख एवढी रक्कम मोहोळ नगरपरिषदेला वितरीत केली आहे. राहिलेली रक्कम शासनाने अद्याप वितरीत केली नाही. आमदार खरे यांच्या पत्रावरच उपमुख्यमंत्री शिंदे यांनी प्रधान सचिव नगरविकास विभाग यांना 'अ' प्रमाणे कार्यवाही करावी असा आदेश दिला असून यामुळे नगरपरिषदेला अग्निशामक दलाची गाडी उपलब्ध होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. या निर्णयामुळे व्यापाऱ्यांतून समाधान व्यक्त होत आहे.

**बंद दाराआडचा तपशील लवकरच जाहीर करणार**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सोबत बंद दाराआड तब्बल ३५ मिनिटे चर्चा झाली. त्याचा तपशील मी वेळ आल्यावर जाहीर करेन मात्र काही दिवसांत ना. एकनाथ शिंदे हे मोहोळ च्या दौऱ्यावर येणार आहेत. मोहोळ शहर व तालुक्याच्या विकासासाठी निधीची कमतरता भासू देणार नाही. 'राजू तुला आमदार झालेले मला बघायचे होते. आज तू आमदार झालास तुज्या पाठीमागे मी एकनाथ शिंदे खंबीरपणे उभा आहे' असे उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाल्याचे आमदार राजू खरे यांनी सांगितले.

## अकलूज येथे जिल्हा...

मेहता यांच्याहस्ते तसेच प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत क्रीडा स्पर्धेच्या उदघाट्नाने महोत्सवाची सुरुवात होणार आहे.

सदर महोत्सवात बॅडमिंटन, रस्सीखेच, टेबल-टेनिस, बुद्धीबळ,गोळा फेक, थाळी फेक, लांब उडी, उंच उडी, कॅरम, धावणे,चालणे,रिले, क्रिकेट, कबड्डी, व्हॉलिबॉल व इतर मैदानी खेळ होणार आहेत.तसेच पाककला,रांगोळी, समुह नृत्य, गायन,वेशभूषा इत्यादी सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहेत. सदरच्या स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी जिल्हासह आयुक्त श्रीमती वीणा पवार यांच्या नेतृत्व व मार्गदर्शनाखाली जिल्हयातील सर्व नगरपरिषद यांचे मुख्याधिकारी व अधिकारी – कर्मचारी कामकाज पाहत आहेत.तसेच सांस्कृतिक कार्यक्रम व बक्षिस वितरण समारंभ स्मृतीभवन यशवंत नगर, अकलूज येथे दिनांक 12 जानेवारी 2025 रोजी दु 12.00 वाजता होणार आहे. सदर कार्यक्रमास जिल्हा क्रीडा अधिकारी ,जिल्हा आरोग्य अधिकारी यांचे मोलाचे सहकार्य लाभणार आहे. तसेच सदर कार्यक्रमास शंकरराव मोहिते महाविद्यालय, अकलूज या कॉलेजचे प्राचार्य व पंच यांचे सहकार्य लाभणार आहे.

"Health is wealth" असा संदेश या क्रीडा व सांस्कृतीक महोत्सवात दिला जाणार आहे.कलागुणांना वाव मिळणे, रोजच्या धकाधकी व तणावातून मुक्त होऊन छंद जोपासण्यासाठी अधिकारी, कर्मचारी यांना प्रोत्साहित करणे व एक नवी उर्जा घेऊन नवनवीन सकारात्मक कामे करण्यासाठी सज्ज होण्यासाठी हा क्रीडा व सांस्कृतीक महोत्सव आयोजित केला असून, जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धा आणि सांस्कृतिक महोत्सवाची नियोजनबध्द तयारी करण्यात आली असल्याची माहिती जिल्हा सह आयुक्त श्रीमती वीणा पवार यांनी दिली.

## यात्रा कालावधीमध्ये अन्न...

पदार्थाची योग्य विल्हेवाट लावावी. दुध व दुग्धजन्य अन्नपदार्थ हे ताजे व योग्य तापमानात साठवणूक केलेले आहेत याची खात्री करूनच खरेदी करावी. (दुध, बासुंदी,रबडी, श्रीखंड, दही इत्यादी)दुध व दुग्धजन्य अन्नपदार्थ हे ताजे व योग्य तापमानात साठवणूक केलेले योग्य कालावधी मध्येच सेवन करावे.अन्न विषबाधा होणार नाही याची खबरदारी घ्यावी.बर्फ युक्त पेये पिण्याचे टाळावे.सार्वजनिक ठिकाणी धुम्रपान करु नये, तंबाखु/गुटखा/पानमसाला इत्यादीचे सेवन करुन सार्वजनिक ठिकाणी थुंकू नये. तसेच या कार्यालयामार्फत जानेवारी ते डिसेंबर 2024 या कालावधीमध्ये प्रतिबंधित अन्न पदार्थाच्या अनुषंगाने 08 ठिकाणी धाडी टाकून 10 लाख 46 हजार 828 रुपये किंमतीचा साठा जप्त करण्यात आलेला आहे. सदर प्रकरणी संबंधित विक्रेत्यांविरुध्द शहरातील विविध पोलिस स्टेशनमध्ये फिर्याद दाखल करण्यात आलेले आहे. तसेच यापुढे देखील कार्यालयामार्फत वेळोवेळी गोपनिय पध्दतीने माहिती काढून प्रतिबंधित अन्न पदार्थाच्या अनुषंगाने कडक कारवाई घेण्यात येईल अशी माहिती अन्न औषध प्रशासनचे सहायक आयुक्त सा.ए.देसाई यांनी दिली आहे.

## सोलापूर जिल्हा दूध संघ...

**संचालकपदावर पाणी सोडण्याची तयारी**

संचालक मंडळ राहिले काय किंवा बरखास्त झाले काय? यापेक्षा शेतकरी दूध उत्पादकांसाठी दूध संघ राहिला पाहिजे, ही आमची भावना असल्याचे संघाचे व्हाइस चेअरमन दीपक माळी व संचालक औदुंबर वाडदेकर यांनी सांगितले. सहकारी संघ अडचणीतून बाहेर काढण्यासाठी आमची संचालकपदावर पाणी सोडण्याची तयारी असल्याचे त्यांनी सांगितले.

## वात्रटिका

### टिकटिक, किटकिट

आधी फुटला, नंतर तुटला
तरीही छंद नाही सुटला...
आता चुचकारणे सुरू आहे
पण आमचा जीव विटला...
तुतारीच्या मागे घड्याळाची
सतत सुरू आहे टिकटिक...
उतारवयात पावर झाली लो
आणि डोक्याला किटकिट...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
8698067566

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स (0217)2605091 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone-0217-2605091 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# बंद अवस्थेतील ऑक्सिजन निर्मिती प्रकल्प तात्काळ सुरु करा- रोहन सुरवसे पाटील



एचएमपीव्ही व्हायरसचा संभाव्य धोका ओळखून सरकारने व प्रशासनाने योग्य ती खबरदारी घेणे गरजेचे आहे. बंद अवस्थेतील ऑक्सिजन प्रकल्प तात्काळ सुरु होणे गरजेचे आहे.

**- रोहन सुरवसे-पाटील**
सरचिटणीस, महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेस

**पुणे (कटूसत्य वृत्त):-** कोरोना व्हायरस नंतर जग आता नवीन एचएमपीव्ही व्हायरस च्या संकट छायेत आहे. चीन मधून आलेल्या ह्या व्हायरसचे भारततही आतापर्यंत सात बाधित रुग्ण सापडले असून बाधित रुग्णांची संख्या वाढण्याची भीती आरोग्य तज्ञांकडून व्यक्त केली जात आहे. याच पार्श्वभूमीवर खबरदारी घेण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

ऑक्सिजनच्या तुटवड्यामुळे कोराना काळात आणीबाणीची परिस्थिती अनुभवल्यानंतर पुणे महापालिकेसह जिल्ह्यातील विविध रुग्णालयात एकूण ६० प्रकल्प उभारण्यात आले होते. मात्र, यातील १९ प्रकल्प सद्यस्थितीत बंद आहेत. हे बंद असलेले ऑक्सिजन प्रकल्प एचएमपीव्ही व्हायरस चे संकट ओळखून तात्काळ सुरु करण्याची मागणी महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे सरचिटणीस रोहन सुरवसे-पाटील यांनी केली आहे. मागणीचे निवेदन निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम यांच्याकडे देण्यात आले. यावेळी पुणे शहर व जिल्हा विद्यार्थी काँग्रेस सरचिटणीस कृष्णा साठे, ज्ञानेश्वर जाधव हे उपस्थित होते.

कोरोना काळात कोव्हीड बाधितांमध्ये गंभीर रुग्णांना ऑक्सिजनची गरज भासत होती. रुग्ण संख्या प्रचंड प्रमाणात वाढल्याने शहरात ऑक्सिजनचा तुटवडा निर्माण झाला होता. विविध उपाययोजना करून, ऑक्सिजन निर्मिती प्रकल्पांवर अधिकाऱ्यांची नियुक्ती करून, ऑक्सिजन वाहतुकीसाठी 'ग्रीन कॉरिडॉर' करून ऑक्सिजन पुरवठा मार्गी लावण्यात आला होता. मात्र, यावर कायमस्वरूपी उपाय म्हणून महापालिकेसह इतर शासकीय रुग्णालयांत ऑक्सिजन प्रकल्प उभारण्याचा निर्णय घेण्यात आला. त्याची सुरुवात ही झाली. यासाठी महापालिका, जिल्हा नियोजन समितीने आर्थिक तरतूद केली. तसेच त्यावेळी नगरसेवकांनी आपला निधी वर्ग केला. अन्य काही लोकप्रतिनिधी, आमदारांनीही निधी दिला. काही कंपन्यांनीही सामाजिक उत्तरदायित्व निधीतून (सीएसआर) हे प्रकल्प उभारण्यासाठी मदत केली. अत्यंत कमी वेळेत हे प्रकल्प उभे राहिले. मात्र, ते सध्या बंद आहेत.

महापालिका, रेल्वे रुग्णालय आणि ससून रुग्णालयामध्ये एकूण अठरा ऑक्सिजन निर्मिती प्रकल्प उभारण्यात आले होते. त्यापैकी सध्या तेरा प्रकल्प सुरु असल्याची माहिती आहे. बंद असलेले प्रकल्प पुन्हा सुरु करण्याची मागणीही महापालिका आयुक्तांकडे सुरवसे पाटील यांनी केली आहे.

आकडेवारी :
जिल्ह्यातील एकूण ऑक्सिजन निर्मिती प्रकल्प - ६०
पैकी सुरु - ४१
पैकी बंद - १९

जिल्ह्यातील एकूण ६० पैकी महापालिका क्षेत्रात एकूण १८ प्रकल्प आहेत. यापैकी १३ सुरु असून उर्वरित ५ बंद आहेत. त्यामध्ये पुणे महानगर पालिका, ससून रुग्णालय आणि रेल्वे रुग्णालय आदींचा समावेश आहे.

जिल्हा शल्य चिकित्सक यांच्या अखत्यारीत ३७ ऑक्सिजन प्रकल्प आहेत. त्यापैकी २३ सुरु आहेत.

# डॉ. सुजीत मिश्रा यांनी सोलापूर विभागाचे विभागीय रेल्वे व्यवस्थापक (DRM) म्हणून पदभार स्वीकारला




**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** डॉ. सुजीत मिश्रा यांनी दिनांक 06 जानेवारी 2025 रोजी मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाचे नवीन विभागीय रेल्वे व्यवस्थापक (DRM) म्हणून पदभार स्वीकारला. 1994 च्या सर्व्हिस ऑफ इलेक्ट्रिकल इंजिनिअर्स (IRSEE) परीक्षेच्या बॅचमधील इंडियन रेल्वे चे वरिष्ठ अधिकारी, डॉ. मिश्रा यांनी त्यांच्या नवीन भूमिकेसाठी भरपूर कौशल्य आणि एक विशिष्ट ट्रॅक रेकॉर्ड आणला आहे. डीआरएम, सोलापूर विभागाचा पदभार स्वीकारण्यापूर्वी ते भारतीय रेल्वे इन्स्टिट्यूट ऑफ ट्रान्सपोर्ट मॅनेजमेंट (IRITM), लखनौ येथे वरिष्ठ प्राध्यापक म्हणून कार्यरत होते. त्यांनी श्री नीरज कुमार दोहरे यांच्याकडुन पदभार स्वीकारला.

**शैक्षणिक आणि प्रशासकीय पार्श्वभूमी**

डॉ.मिश्रा यांनी दयालबाग एज्युकेशनल इन्स्टिट्यूट, आग्रा येथून 1993 मध्ये पदवी प्राप्त करून अभियांत्रिकी (विद्युत अभियांत्रिकी) मध्ये पदवी घेतली आहे. नंतर त्यांनी विद्युत अभियांत्रिकी विभागातील पॉवर सिस्टीम्समध्ये IIT-BHU, वाराणसी येथून पीएच.डी. प्राप्त केली आहे . या क्षेत्रातील आपले कौशल्य आणखी मजबूत करत आहे.

अनेक दशकांच्या कारकिर्दीत, त्यांनी भारतीय रेल्वेमध्ये विविध पदांवर सेवा केली आहे, त्याचा तपशीलः

- चित्तरंजन लोकोमोटिव्ह वर्क्स (CLW), चित्तरंजन
- संशोधन डिझाइन आणि मानक संघटना (RDSO), लखनऊ
- उत्तर-पूर्व रेल्वे
- बनारस लोकोमोटिव्ह वर्क्स (BLW), वाराणसी
- राष्ट्रीय रेल्वे आणि वाहतूक संस्था (NRTI)
- परराष्ट्र मंत्रालय
- इंडियन रेल्वे इन्स्टिट्यूट ऑफ ट्रान्सपोर्ट मॅनेजमेंट (IRITM), लखनऊ

वरिष्ठ प्राध्यापक (CB&SEE) या नात्याने त्यांच्या नेतृत्वाखाली, IRITM ला नॅशनल अ‍ॅक्रेडिटेशन बोर्ड फॉर एज्युकेशन अँड ट्रेनिंग (NABET) द्वारे कॅपॅसिटी बिल्डिंग कमिशन (उइउ) राष्ट्रीय मानकांनुसार 4-स्टार (ATI UTKRIST) द्वारा मान्यता मिळाली आहे.

त्यांच्या प्रशासकीय कामगिरीच्या व्यतिरिक्त, डॉ. सुजीत मिश्रा हे एक उत्सुक वाचक, लेखक आणि छायाचित्रकार आहेत.त्यांच्या व्यापक अनुभवामुळे आणि दूरदर्शी दृष्टीकोनामुळे सोलापुर रेल्वे विभागाचा विकासाचा आलेख उंचावेल.शिवाय सोलापूर रेल्वे विभागाला त्यांच्या येण्याने गतिमान नेतृत्व मिळाले आहे.



## ग्रामपंचायत जाधववाडी(मा),ता.माढा,जि.सोलापूर

**टेंडर नोटीस**

ग्रामपंचायत जाधववाडी(मा),ता.माढा,यांचेकडून खालील कामे करण्यासाठी नोंदणीकृत मक्तेदाराकडून बंद लखोट्यात निविदा मागविण्यात येत आहेत. लेखाशिषः१५वा वित्त आयोग व जिल्हा वार्षिक योजना निधी

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | बयाणा रक्कम | टेंडर फॉर्म फी | कामाची मुदत | ठेकेदार वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | बंधिस्त गटार करणे | ९०,०००/- | ९००/- | १००/- | ३० दिवस | खुला |
| २) | रेन वॉटर हार्वेस्टिंग | १८,०००/- | १८०/- | १००/- | ३० दिवस | खुला |
| ३) | अंगणवाडी देखभाल, दुरुस्ती | ९९,९९०/- | १०००/- | १००/- | ३० दिवस | खुला |

टीपः १) कोऱ्या निविदा मिळणेचा कालावधी दि.०९/०१/२०२५ सकाळी १०.०० पासून. २) भरलेल्या निविदा स्वीकारण्याचा दि.१३/०१/२०२५ सकाळी १० ते ६ वाजेपर्यंत ठिकाण ग्रामपंचायत कार्यालय जाधववाडी(मा) ३) निविदा उघडणेचा दि.१५/०१/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता ४) निविदे संदर्भातील अटी व शर्ती तसेच लिफाफा क्रमांक १ व २ ची माहिती ग्रामपंचायत कार्यालयात पहावयास मिळेल. ५) निविदा मंजूर,नामंजूर अथवा सर्व निविदा नाकारण्याचा अथवा निविदा रद्द करण्याचा अधिकार मा.सरपंच यांना राखुन ठेवला आहे.

सही/- ग्रामविकास अधिकारी,
ग्रामपंचायत,जाधववाडी(मा),
ता.माढा,जि.सोलापूर

शिक्का

सही/- सरपंच,
ग्रामपंचायत,जाधववाडी(मा),
ता.माढा,जि.सोलापूर



# नारायण चिंचोली येथील ग्रामदैवत सूर्यनारायण देव यात्रा उत्सव सुरू

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** पंढरपूर तालुक्यातील नारायण चिंचोली येथील ग्रामदैवत असलेल्या सूर्यनारायण देवाची यात्रा मोठ्या उत्साह सुरू झाली असून ही यात्रा 31 डिसेंबर पासून सुरू असून ही यात्रा पुढे संपूर्ण महिनाभर 28 जानेवारीपर्यंत महिनाभर सुरू असते .परंतु यात्रेचा कालावधी हा रथ सप्तमी पर्यंत असल्याचे पुजारी गणेश अवताडे यांनी सांगितले .

पंढरपूर - सोलापूर -रोडवर अवघ्या दहा किलोमीटर वर असणाऱ्या नारायण चिंचोली येथे पुरातन हेमाडपंथी सूर्यनारायणाचे मंदिर असून हे मंदिर अति प्राचीन असून हे मंदिर अत्यंत दुर्मिळ व कोरीव बांधकाम असलेले महाराष्ट्रातील एकमेव असे मंदिर आहे . नारायण चिंचोली येथे सूर्यनारायण देव यात्रेनिमित्त संपूर्ण महाराष्ट्रातून हजारो भाविक पौष महिन्यामध्ये दर्शन घेण्यासाठी येत असतात .आलेल्या भाविकांसाठी सर्व प्रकारच्या देण्यात येणाऱ्या सोयी सुविधा करण्यात आली असल्याची माहिती नारायण चिंचोली चे ग्रामपंचायत प्रशासनाच्या वतीने करण्यात आल्याची माहिती सरपंच नर्मदा लक्ष्मण धनवडे, पांडुरंग सहकारी साखर कारखान्याचे संचालक तथा नारायण चिंचोली चे माजी सरपंच लक्ष्मण धनवडे, उपसरपंच गहिनीनाथ चव्हाण यांनी दिली.

नारायण चिंचोली येथे संपूर्ण राज्यातून हजारो भाविक येत असतात या भाविकांना मूलभूत सुविधांसह सुलभ दर्शनाची सोय करण्यात आले असल्याची माहिती सूर्यनारायण देव ट्रस्टचे अध्यक्ष विजय कोळेकर यांनी दिली. नारायण चिंचोली येथे महाराष्ट्रातील एकमेव असे पुरातन सूर्यनारायण देवाचे मंदिर असून विशेषतः रविवारी मोठ्या प्रमाणात यात्रा भरते . महिन्यातील 14 जानेवारी रोजी मकर संक्रमणाचा काळ असून यावेळी सूयार्ची उगवते किरणे मूर्ती वरती पडतात. हा उत्सव पाहण्यासाठी तालुक्यात जिल्ह्यातील हजारो भाविक मोठ्या संख्येने उपस्थित असतात. तरी पंचक्रोशीसह तालुक्यातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे. असे आव्हान ग्रामपंचायत प्रशासनाच्या वतीने व सूर्यनारायण देव ट्रस्टच्या वतीने करण्यात आले आहे. ही यात्रा पार पाडण्यासाठी सूर्यनारायण देव ट्रस्ट संचालक मंडळ, ग्रामपंचायत प्रशासन, विविध सामाजिक संघटना . मोठ्या उत्साहाने पार पाडत असतात.



**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता, जलविज्ञान प्रकल्प विभाग, पुणे - ०१.**
**पत्ता :- मध्यवर्ती इमारत जी बरॅक, पुणे- ४११ ००१.**
ई-मेल :-eehpd.pune@gmail.com दूरध्वनी क्र. ०२०-२६१२६९१८

**ई-निविदा सूचना क्र./०६/सन २०२४-२५**

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, जलविज्ञान प्रकल्प विभाग, पुणे-४११००१ जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम निविदाकारांकडून खालील कामाकरीता ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाइन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ https://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत. सविस्तर निविदा सूचना व ई निविदेबाबत सर्व माहिती शसनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, जलविज्ञान प्रकल्प विभाग, पुणे- ४११ ००१ यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्वीकारली जाणार नाही. सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

कामाचे नांव :- Installation of Gauge Post and Musto Type Benchmark @ RTDAS GD Stations 1) Devikavatha 2) Diskal 3) Nira - Narsinhpur 4 ) Pandharpur 5 ) Ruddhewadi 6) Siddhewadi 7) Takali Installed Under HP II or NHP for Hydrology Project Sub Division, Solapur.
जिल्हा :- सोलापूर
निविदेची किंमत रुपये :- २३,२७,८८३/-
ई-निविदा उपलब्ध कालावधी :- दिनांक १५/०१/२०२५ वेळ ११:०० पासुन ते दिनांक २२/०१/२०२५ वेळ १७ : ०० पर्यत
ई-निविदा उघडण्याचा :- दिनांक २४/०१/२०२५ वेळ ०१:०० वाजता.

जा.क्र./जविप्रवि/पुणे/लेखा-१/२९/सन २०२५
कार्यकारी अभियंता, जलविज्ञान प्रकल्प विभाग, पुणे-०१.
दिनांक :-०६/०१/२०२५

सही/- (नरेंद्र र घागे)
कार्यकारी अभियंता,
जलविज्ञान प्रकल्प विभाग, पुणे- ०१.

जिमाका/सो/जाहि/२६३/२०२४-२५



# बांधकाम कामगारांच्या प्रश्ना संदर्भात भाजपा आणि शिंदे गटाचे पदाधिकारी मुख्यमंत्र्यांना भेटणार



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र शासना मार्फत बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ बांधकाम कामगार व इतर कामगार यांची नोंदणी करुन घेऊन त्यांना अनेक प्रकारचे लाभ व आरोग्य योजना मिळवून देण्याचा स्तुत्य उपक्रम महाराष्ट्र शासनाने चालू केलेला आहे. परंतु शासनाच्या योजनेचा लाभ घेत असलेल्या कामगारांना मागील काही दिवसापासून अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. सदरील योजना ही कामगार घर बसल्या आपल्या मोबाईल द्वारे अथवा आपल्या गावाजवळील घराजवळील ऑनलाईन सेंटर मधून इडउह च्या वेबसाईटवर फॉर्म भरुन घेत होतो. मागील विधानसभेच्या निवडणुकीच्या आचार संहितेच्या पार्श्व भुमीवर वेबसाईट बंद करुन मा. उच्च न्यायलय, मुंबई यांचा ०८ नोहेंबर २०२४ वेबसाईट व नोंदणी कोणत्याही नवीन नियम व अटी न घालता पुर्ववत सुरु ठेवण्यात यावी असा आदेश असतानाही रिट याचिका नं.३३५९७/२०२४ अचानक कोणतीही पुर्व सुचना कामगारांपर्यंत पोहोचोविता अचानक कामगार नोंदणी ही इडउह च्या वेबसाईटवरुन बंद करुन फक्त आणि फक्त सुविधा केंद्रावरच करण्यात यावी. असा आदेश दिला व केंद्राचे वाटप करुन केंद्रावर नोंदणी व नुतनीकरण प्रक्रिया सुरु केले आहे.

सदर सुविधा केंद्रावर जावून नोंदणी प्रक्रिया पूर्ण करणे हे कामगारांस अत्यंत खर्चिक व त्रासदायक होत आहे. यातील अनेक कामगार हे ग्रामीण व दुर्गम भागातील रहिवाशी असुन पोहोचू शकत नाहीत व त्यांना सदरील सुविधा केंद्रा पर्यंत जाण्याकरीता व नोंदणी प्रक्रिया पूर्ण करण्याकरीता प्रचंड खर्च होत असुन फक्त आणि फक्त ठेकेदारांना सुविधा केंद्राची ठेकेदारांना पोसण्याकरीता सदरील कामगारांची सदरील सुविधा केंद्रा पर्यंत ऑनलाईन नोंदणी ही बंद केलेली असून सदर नोंदणी सुविधा ही पूर्वी प्रमाणे ऑनलाईन करावी अशी मागणी निवेदनाद्वारे भाजप आणि शिवसेना शिंदे गटाच्या पदाधिकाऱ्यांनी केली आहे.


# ग्रीन फिंगर्स कॉलेज तर्फे स्कूल कनेक्ट कार्यक्रमाचे आयोजन

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** ग्रीन फिंगर्स कॉलेज तर्फे स्कूल कनेक्ट कार्यक्रमांतर्गत बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी करियर मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी एक प्रभावी करिअर मार्गदर्शन कार्यशाळा आयोजित केली गेली आजच्या जलद विकसित जगात पारंपारिक करिअर मार्ग हाच एकमेव पर्याय राहिलेला नाही आर्टिफिशल इंटलिजन्स डिजिटल मार्केटिंग ग्राफिक्स डिझाईन या क्षेत्रातील करियर फायदेशीर म्हणून उदयास आले आहेत याची माहिती उपस्थित विद्यार्थ्यांना देण्यात आली. या कार्यशाळेत नवीन करिअरच्या संधी व त्यामध्ये येणारे नवीन नवीन सॉफ्टवेअर मधील बदल तसेच करिअरमधील आवश्यक कौशल्याची माहिती देण्यात आली या कार्यशाळेत अशा व्यक्तींची उदाहरणे देण्यात आली ज्यांनी नवीन काळातील करिअरमध्ये प्रवेश केलेला आहे. या कार्यशाळे च्या माध्यमातून विद्यार्थ्यांना चौकटी बाहेर विचार करण्यास प्रेरित केले गेले.

ही कार्यशाळा माळशिरस, अकलूज, नरसिंगपूर, टेंभुर्णी इत्यादी अनेक गावातील विविध महाविद्यालयांमध्ये संपन्न करण्यात आली.

या कार्यशाळेमध्ये नवीन शैक्षणिक धोरण व त्यामधील बदल याची माहिती विद्यार्थ्यांना दिली तसेच शैक्षणिक धोरणानुसार शैक्षणिक व नवीन तंत्रज्ञानानुसार असणाऱ्या करिअर संधी विषयी मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेला विद्यार्थ्यांचा उत्साह पूर्ण प्रतिसाद मिळाला.

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) हिंदी सिनेसृष्टीतील महानायक अभिनेता २) नदीचा काठ, बाण ३) अंतराळात प्रवास करणारे वाहन, नया उलट लिहा ४) उजेड ५) साठ मिनिटांचा एक ** ६) वायू, वारा ७) दुप्पट (इंग्रजीत) ११) नोकरच्या विरूध्दार्थी, धनी १२) गन उलट लिहा १३) कर्मचाऱ्यांना मिळणारा पगार १५) एक (इंग्रजीत) १७) फोटो (हिंदीत) २१) दहा (हिंदीत) २२) श्रीरामाचा एक बंधू २३) उद्या (हिंदीत) २४) ढग (हिंदीत) २५) दशमी नंतरचा दिवस २६) दहा (इंग्रजीत) २८) थकीत येणे राहिलेली रक्कम ३०) घोड्याच्या पायाच्या खुराला ठोकतात ती अर्धवर्तुळाकार पट्टी ३३) आदर सत्कार, ** सन्मान ३४) पुण्यातील प्रसिध्द गणपती-***** हलवाई ३५) वाईट सवय ३६) आठवड्यातील एक वार ३७) मालावर भरावा लागणारा कर, टॅक्स ३८) दुधावरील मलई ४०) लहान बाळाला टोचतात ती ४२) दशरथपुत्र ४४) दात ४५) तीन दुणे ४७) शरीर (हिंदीत), दक उलट लिहा ४८) सायकलच्या चाकाच्या या भागावर टायर बसवितात

**आडवे शब्द :** १) गुढीपाडव्यानंतरचा एक सण ४) भवानीमातेचे मंदिर छ. शिवरायांनी या किल्ल्यावर बांधले आहे ८) क्रिकेटमधील धाव (इंग्रजीत) ९) सशाशी शर्यत लावणारा कथेतील प्राणी १०) हवामानातील उष्मा १३) पोशाख, एक म्हण-जसा देश तसा ** १४) आश्चर्य १६) नजीक, समीप १८) मोफत (इंग्रजीत) १९) पाण्यावर तरंगणारा एक पक्षी २०) घर, निवास २४) अकरा दुणे २५) मोबाईल फोनची सेवा पुरविणारी आयडिया प्रमाणे एक कंपनी २७) स्त्रियांचा नाकातील दागिना २९) वस्तूचे मूल्य, भाव ३०) अनेक रस्ते एकत्र येतात असे मोक्याचे ठिकाण ३१) शरीर, काया ३२) किमानच्या विरूध्दार्थी ३४) पाणीयुक्त चिखल, गाळ ३७) जीभ (हिंदीत) ३८) घर वा फर्निचरकरता या वृक्षाचे लाकूड वापरतात ३९) थंड, गार, मुलीचे एक नाव ४१) काकाची बायको ४२) एक माजी भारतीय फलंदाज-अंबाती *** ४३) वाकडातिकडा नसलेला, स्ट्रेट ४५) मस उलट लिहा ४६) शेकाप पक्षाचे पूर्ण नाव-**** कामगार पक्ष ४९) औषध (हिंदीत) ५०) पाच दुणे ५१) बारा गुणिले पाच ५२) गुजरात जवळील केंद्रशासित प्रदेश-दिव ***

## सुडोकु - 147

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 9 | 8 | | | | 2 | 3 | | |
| | | 3 | 5 | 4 | 9 | | 7 | |
| | 5 | | 8 | 3 | | 4 | 9 | 6 |
| 8 | | 2 | | | | | | 4 |
| 7 | | 5 | 3 | | | 1 | | 2 |
| 1 | 9 | 6 | | 8 | | 5 | | |
| | | 9 | | 6 | 3 | 8 | 5 | 1 |
| 3 | 7 | 8 | | | | | | |
| | | 1 | | | | | | |



## Classified - छोटी जाहीरात

**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

-: संपर्क :-
8083608083
9922646566
8698732109

(सरकार मान्य)
**अथर्व पेस्ट कंट्रोल**
An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
9822964815
9421984815
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

**विकणे आहे**
सोलापूर शहरातील चांगल्या लोकवस्तीतील ST स्टॅन्ड व रेल्वे स्टेशन जवळ आवंतीनगर, शरद पवार शाळेजवळ, लोकमंगल ऑक्सिपार्क, येथील अ विंग मधील ७०४ नंबरचा फ्लॅट विकणे आहे.
**संपर्कः** 9881361260







**वाचकांसाठी निवेदनः** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

# जिल्हा प्रशासनाच्या वतीने विविध क्रीडा स्पर्धेचे आयोजन



**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** जिल्हा सहआयुक्त नगरपालिका प्रशासन, जिल्हा-सोलापूर यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हास्तरीय नगरपरिषद/ नगरपंचायत जिल्हा वार्षिक क्रीडा व सांस्कृतिक महोत्सव २०२४-२५ चे आयोजन अकलूज येथे १० जानेवारी २०२५ ते १२ जानेवारी २०२५ या कालावधीमध्ये करणेत आले आहे.

या महोत्सवात सोलापूर जिल्हयातील १७ नगरपरिषदा /नगरपंचायती व जिल्हा सहायुक्त कार्यालय अशी एकूण १८ कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी सहभागी होऊन आपले क्रीडा तसेच सांस्कृतिक क्षेत्रातील नैपुण्य दाखविणार आहेत.यंदा अकलूज नगरपरिषदेला या महोत्सवाचे यजमानपद मिळाले असून विजयसिंह मोहिते -पाटील क्रीडा संकुल, अकलूज येथे शुक्रवार दि १० जानेवारी २०२५ रोजी सकाळी ९.०० वा मा.श्री कुमार आशीर्वाद (जिल्हाधिकारीसो सोलापूर )यांच्या अध्यक्षेतेखाली व मा.श्रीमती पूनम मेहता (सह आयुक्त ,नगरपरिषद प्रशासन ,पुणे विभाग ,पुणे ) यांच्याहस्ते व प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत क्रीडा स्पर्धेच्या उदघाट्नाने महोत्सवाची सुरुवात होणार आहे.

सदर महोत्सवात बॅडमिंटन, रस्सीखेच ,टेबल-टेनिस, बुद्धीबळ, गोळा फेक, थाळी फेक ,लांब उडी,उंच उडी, कॅरम ,धावणे,चालणे, रिले, क्रिकेट, कबड्डी, व्हॉलिबॉल व इतर मैदानी खेळ होणार आहेत.तसेच पाककला, रांगोळी, समुह नृत्य, गायन, वेशभूषा इत्यादी भरगच्च सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहेत .सदरच्या स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी जिल्हासह आयुक्त श्रीमती वीणा पवार यांच्या नेतृत्व व मार्गदर्शनाखाली जिल्हयातील सर्व नगरपरिषद यांचे मुख्याधिकारी व अधिकारी - कर्मचारी कामकाज पाहत आहेत.तसेच सांस्कृतिक कार्यक्रम व बक्षिस वितरण समारंभ स्मृतीभवन यशवंत नगर ,अकलूज येथे दिनांक १२ जानेवारी २०२५ रोजी दु .१२.०० वाजता होणार आहे. सदर कार्यक्रमास जिल्हा क्रीडा अधिकारी ,जिल्हा आरोग्य अधिकारी यांचे मोलाचे सहकार्य लाभणार आहे .तसेच सदर कार्यक्रमास शंकरराव मोहिते महाविद्यालय,अकलूज या कॉलेजचे प्राचार्य व पंच यांचे सहकार्य लाभणार आहे .

"Health is wealth" असा संदेश या क्रीडा व सांस्कृतीक महोत्सवात दिला जाणार आहे. कलागुणांना वाव मिळणे ,रोजच्या धकाधकी व तणावातून मुक्त होऊन छंद जोपासण्यासाठी अधिकारी ,कर्मचारी यांना प्रोस्ताहीत करणे व एक नवी उर्जा घेऊन नवनवीन सकारात्मक कामे करण्यासाठी सज्ज होण्यासाठी हा क्रीडा व सांस्कृतीक महोत्सव आयोजित केला असून जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धा आणि सांस्कृतिक महोत्सवाची नियोजनबध्द तयारी करण्यात आली असल्याची माहिती जिल्हा सह आयुक्त श्रीमती वीणा पवार यांनी दिली.

# मन आणि मेंदूच्या मशागतीसाठी वाचनाची गरज- प्रा. विष्णू सुर्वे



**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** शेतकरी जसा शेतीची मशागत करतो तसे पुस्तके मन आणि मेंदूची मशागत करतो कारण न वाचणाऱ्या व्यक्तींचे मन आणि मेंदू पडीक जमिनीसारखे अविकसित राहतो. म्हणून वाचकांनी सर्व क्षेत्रात यशस्वी झालेल्या महापुरुषांची चरित्रे कोणत्याही जाती पातीचा विचार न करता वाचावीत त्यामुळे आपल्या व्यक्तिमत्त्वाचा परिपूर्ण विकास होतो असे मत इंग्रजी विभागाचे प्रा. विष्णू सुर्वे सर यांनी व्यक्त केले. ग्रंथालयाने महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या वतीने राबवित असलेल्या वाचन संकल्प महाराष्ट्राचा या अभिनव उपक्रमांतर्गत वाचन कौशल्य कार्यशाळा या उपक्रमात प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. एस. के. टिळेकर, आय क्यू ए सी चे समन्वयक डॉ. एस. एस. देवकर, ग्रंथालय विभाग प्रमुख डी. एस. पाटील, लेखक ता. सा. बावळे, डॉ. व्ही. एम आवड व इतर प्राध्यापक उपस्थित होते. ते आणखी पुढे म्हणाले की, शारीरिक व्यायाम शरीराच्या आरोग्यासाठी जसा केला जातो तसा पुस्तकांचे वाचन मनाच्या आरोग्यासाठी उपयुक्त ठरतो तसेच दलित आत्मकथने वाचत असताना त्यांची दुःखे व समस्या पाहता आपल्या आयुष्यात येणारी दुःखे काहीच नाहीत व या देशात सर्व क्षेत्रात मोठी झालेली माणसे उत्तम वाचक होते म्हणून ते यशस्वी झाले. यावेळी प्रा. विष्णू सुर्वे सर यांनी यशवंतराव चव्हाण डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पंडित जवाहरलाल नेहरू, महात्मा गांधी, महात्मा फुले इ. ची उदाहरणे दिली.

तसेच दुसऱ्या सत्रात लेखक व वाचक सुसंवाद या उपक्रमांतर्गत कथाकार असलेले ता. सा. बावळे यांनी वाचकांशी सुसंवाद साधला त्यावेळी बोलताना बावळे यांनी कथालेखन करत असताना समाजात पाहिलेली विविध वृतीर्ची व प्रवृत्तीची माणसे कथा लेखनासाठी उपयुक्त पडतात तसेच आजचा चांगला वाचक हा उद्याचा चांगला लेखक होऊ शकतो कारण लेखनाची बीजे वाचनातून सापडतात म्हणून वाचकाने जास्तीत जास्त पुस्तकांचे वाचन केले पाहिजे असे पुढे ते म्हणाले. अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. के. टिळेकर सर यांनी वाचकांना संबोधित करताना म्हणाले की, वाचकानी वाचनाची विविध कौशल्य अंगी जोपासली पाहिजेत. तरच आजचा वाचक आपल्या कौशल्याच्या जोरावर उद्याचा उत्कृष्ट लेखक व चांगला वाचक होऊ शकतो. यावेळी महाविद्यालयाच्या हिंदी विभागाचे प्रा. सोमनाथ चव्हाण यांनी ग्रंथालयास आठ पुस्तके भेट दिली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभागाचे डॉ. जे. डी परकाळे सर यांनी केले. पाहुण्यांची ओळख डॉ. एन. टी. लोखंडे सर यांनी करून दिली तर आभार डॉ. सी. बी. लोंढे यांनी मांडले. या उपक्रमास प्राध्यापक, विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा अभिनव उपक्रम यशस्वी होण्यासाठी ग्रंथालयातील कर्मचारी डी. डी. सुर्वे सहा. ग्रंथपाल, आय. बी. शेख राहुल जाधव आणि बापू चव्हाण तसेच प्रबंधक बामणे आणि कार्यालय अधीक्षक मालुसरे परिश्रम घेतले.

# शिवतीर्थ पुरस्काराचे सोमवारी वितरण

## अँड. माने, सुरवसे, ठोकळ, पाटील, खरे मानकरी



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** येथील मराठा समाज सेवा मंडळाच्या वतीने दिल्या जाणाऱ्या शिवतीर्थ पुरस्काराचे वितरण व तिळगुळ समारंभ येत्या सोमवारी 13 जानेवारी 2025 रोजी सायंकाळी ठीक 5:00 वाजता छत्रपती शिवाजी प्रशालेत होणार आहे.

या कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष तथा माजी महापौर मनोहर सपाटे यांच्या अध्यक्षतेखाली व माजी केंद्रीय गृहमंत्री सुशील कुमार शिंदे यांच्या हस्ते पार पडणार आहे. याप्रसंगी ह. भ. प. प्रकाश बोधले महाराज हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित राहणार आहेत

यावेळी कै. अँड. एकनाथ तुळशीराम माने व कै. अंबादास दाजीबा सुरवसे (मुकादम) यांना मरणोत्तर जीवन गौरव पुरस्कार तर माजी आमदार निर्मलाताई शंकरराव ठोकळ, माढ्याचे आमदार अभिजीत धनंजय पाटील, मोहोळचे आमदार राजू ज्ञानू खरे यांना शिवतीर्थ समाजभूषण पुरस्कार देऊन गौरवण्यात येणार आहे. सन्मानचिन्ह, शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

या कार्यक्रमास समाज बांधव व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आव्हान संस्थेचे जनरल सेक्रेटरी प्रा. महेश माने व सांस्कृतिक कमिटी चेअरमन ज्ञानेश्वर सपाटे यांनी केले आहे.

# मुलींनी स्वतःच्या पायावर उभा रहावे- तहसीलदार शिल्पाताई ठोकडे



**करमाळा (कटूसत्य वृत्त):-** पुरुषाबरोबर स्त्रिया सर्व क्षेत्रात उल्लेखनीय यश मिळवत असून स्वतःच्या पायावर उभा राहूनच आपल्या आई-वडिलांचे स्वप्न साकार करावे हीच खरी सावित्रीबाई फुले यांना श्रद्धांजली ठरेल असे मत तहसीलदार शिल्पाताई ठोकडे यांनी व्यक्त केले. श्रीमती गंगुबाई संभाजी शिंदे सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या यावेळी प्रसिद्ध व्याख्याते प्राध्यापक नितीन तळपाडे, शिवसेनेचे युवा नेते दिग्विजय बागल, विजयराव पवार, शिवसेना उप तालुकाप्रमुख अंकुशराव जाधव, डॉक्टर गौतम रोडे, बाळासाहेब वाघ, करमाळा शिवसेना समन्वयक निलेश राठोड, ज्येष्ठ पत्रकार नासिर कबीर, प्राध्यापक अशोक नरसाळे, आदी पदाधिकारी उपस्थित होते.यावेळी संस्थेचे चेअरमन तथा शिवसेना जिल्हाप्रमुख महेश चिवटे यांनी उपस्थितांचे स्वागत केले.

यावेळी बोलताना तहसीलदार शिल्पाताई ठोकडे म्हणाल्या सावित्रीबाई फुलेंनी समाजात स्त्रियांना मानाचे स्थान देण्याचे काम केले आहे. चूल आणि मूल या संस्कृती मधून बाहेर पडण्यास पालक तयार नाही ही दुर्दैवाची गोष्ट आहे. शिक्षणाची कास धरून प्रत्येक मुलींनी शिक्षण घेऊन स्वतःची स्वतंत्र प्रतिमा तथा व्यक्तिमत्व तयार करावे. एक स्त्री शिकली तर तर त्याचे संपूर्ण कुटुंब सासर व माहेर या दोन्ही घरात प्रगती होऊ शकते. यामुळे मुलींनी शिक्षण घ्यावे हि काळाची गरज आहे.

यावेळी प्रसिद्ध व्याख्याते प्राध्यापक नितीन तळपाटे यांनी तब्बल एक तासाच्या आपल्या भाषणातून संपूर्ण जीवन प्रवास विद्यार्थ्यांपुढे मांडला कॉलेजमधून संवेदनशील उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या माध्यमातून मोफत शिक्षण मिळत असून त्याचा आपण फायदा घ्यावा असे आवाहन केले.

यावेळी बोलताना दिग्विजय बागल म्हणाले की, जिल्हाप्रमुख महेश चिवटे यांनी नर्सिंग कॉलेज चालू करून विद्यार्थ्यांना चांगली संधी दिली आहे. रुग्णांसाठी मोफत दवाखाना सुरू करण्याचे शिवसेना कार्यकर्त्यांचे स्वप्न आम्ही सगळेजण मिळून पूर्ण करणार असल्याचे सांगितले.

# सावित्रीबाई फुलेंचा आदर्श घेऊन स्वावलंबी बना

## तृप्ती खरे : तालुकास्तरीय किशोरी हितगुज मेळावा, विविध स्पर्धांचे आयोजन



**पोखरापूर :(कटूसत्य वृत्त) :-** क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या कायार्चा आदर्श घेऊन आजच्या प्रत्येक स्त्रीने स्वावलंबी बनून ध्येय साध्य करण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन तृप्ती राजू खरे यांनी केले.

मोहोळ तालुक्याच्या वतीने तालुकास्तरीय किशोरी हितगुज मेळावा घेऊन सावित्रीबाई फुले यांची जयंती तीर्थक्षेत्र वडवळ येथील भक्त निवास येथे उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी मोहोळ तालुक्याचे आमदार राजू खरे यांच्या पत्नी तृप्ती खरे यांच्या हस्ते बाल आनंद मेळाव्याचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी गटशिक्षणाधिकारी अविचल महाडिक, सहाय्यक गटविकासाधिकारी विजय देशमुख, शिक्षण विस्ताराधिकारी मल्लिनाथ स्वामी, कार्यक्रमाच्या अध्यक्ष सई करंडे, प्रमुख पाहुणे म्हणून अमृता पाटील, नागनाथ देवस्थान पंचकमिटी अध्यक्ष श्रीकांत शिवपुजे महाराज, सद्गुरु नागनाथ महाराज, अन्नछत्र मंडळ अध्यक्ष शाहू धनवे आदींसह शिक्षक, शिक्षिका उपस्थित होते. यावेळी योग प्रात्यक्षिके पुष्पा कांबळे, वनिता गवळी, नंदा राऊत व चारुशिला गुरव यांनी घेतली.

युवा उद्योजक विद्या पाटील व डॉ. शशिकला सुरतकर या कर्तृत्वान महिलांच्या मुलाखती घेण्यात आल्या. डॉ. स्मिता पाटील, सहाय्यक पोलीस निरीक्षक अंजना फाळके, अहिल्या कांबळे यांनी यावेळी मार्गदर्शन केले. जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील शिक्षकांच्या गीत मंच टीमने बहारदार असे गीतगायन केले. रांगोळी, चित्रकला, लिंबू चमचा आणि पोस्टर्स स्पर्धा घेण्यात आल्या. सूत्रसंचालन सारीका पलंगे व प्रतिभा कांबळे यांनी केले.

# तर देशाची सेवा एक चांगला नागरिक बनुन सुद्धा करता येते- सहा.पोलीस निरीक्षक साळुंखे



अकलूज (कटूसत्य वृत्त):- भारताचे चांगले सुजाण नागरिक बनायचे असेल तर विद्यार्थ्यांनी चांगले वागले पाहिजे, आपल्यावर चांगले संस्कार झाले पाहिजेत आणि विद्यार्थ्यांनी मोबाईल पासून दूर राहिले पाहिजे. विद्यार्थ्यांनी खेळामध्ये प्राविण्य मिळवण्यासाठी खेळात सहभागी झाले पाहिजे. विद्यार्थ्यांनी शाळेत येताना जाताना वाहतुकीचे नियम पळून शिस्तीने ये-जा केली पाहिजे.शाळेच्या बाहेर कोणत्याही विद्यार्थ्यांनी हुल्लडबाजी करू नये.बेशिस्त वर्तन करणाऱ्यांवर पोलिसांचे लक्ष राहणार असून त्यांच्यावर कडक कारवाई करण्यात येणार आहे. देशाची सेवा एक पोलीस म्हणून नाही तर एक चांगला नागरिक बनून सुद्धा करता येते. भारताला विकसित देश बनवायचा असेल तर विद्यार्थ्यांची गरज आहे असे मतं अकलूजचे सहाय्यक पोलीस निरीक्षक विक्रम साळुंखे यांनी माळीनगर येथे बोलताना व्यक्त केले. निर्भया पथक अकलूज व अकलूज पोलीस स्टेशन यांचे वतीने बुधवारी येथील दि मॉडेल विविधांगी प्रशाला,माळीनगर येथील इयत्ता पाचवी ते नववी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना सहा.पोलीस निरीक्षक विक्रम साळुंखे

यांनी वेगवेगळ्या विषयांवर मार्गदर्शन करून विद्यार्थ्यांशी संवाद साधला.विद्यार्थ्यांच्या अडचणी ऐकून घेतल्या.

यावेळी निर्भया पथकाच्या पोलीस निरीक्षक करिष्मा वनवे, पोलीस नाईक श्री. नागरगोजे,पोलीस हवालदार विठ्ठल मिसाळ, इन्नूस आतार,शब्बीर नदाफ,प्राचार्य कलाप्पा बिराजदार,उपप्राचार्य रितेश पांढरे, पर्यवेक्षक कल्याण कापरे, शिक्षक-शिक्षिका व विद्यार्थी उपस्थित होते.

# सोलापुरात ७० टन प्लास्टिक जप्त

## पाचशे दुकानांची तपासणी : पावणेदहा लाखांचा दंड



**सोलापूर : (कटूसत्य वृत्त) :-** महापालिकेच्यावतीने शहरात प्लास्टिकमुक्ती मोहीम राबवण्यात येत आहे. या मोहिमेअंतर्गत आत्तापर्यंत एक डिसेंबर ते सात जानेवारीपर्यंत पाचशेहून अधिक दुकानांची तपासणी केली. यात १९२ दुकानदारांकडून नऊ लाख ७० हजार रुपयांचा दंड वसूल केला आहे. सोलापुरात मोठ्या प्रमाणात बंदी घालण्यात आलेल्या प्लास्टिकचा वापर केला जात आहे. त्यामुळे शहर प्लास्टिकमुक्ती करण्याचा निर्णय अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांनी घेतला. त्यानुसार विविध पथकांच्या माध्यमातून शहरातील सर्व दुकानांची तपासणी केली जात आहे. विक्री करणारे आणि ग्राहकांना कॅरीबॅग देणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई केली जात आहे. डिसेंबर महिन्यामध्ये ३६९ दुकानांची तपासणी करत ५० टन प्लास्टिक जप्त केले होते. ११६ जणांवर कारवाई करत पाच लाख ८५ हजार रुपयाचा दंड वसूल केला आहे. एक ते सात जानेवारीपर्यंत शहरातील ३५९ दुकानदारांची तपासणी तपासणी करून ६७ जणांकडून ३४ हजार रुपयांचा दंड वसूल केला आहे. झोन एकमध्ये ४३ दुकानदारांकडून दोन लाख २० हजार, दोनमध्ये २२ दुकानदारांकडून एक लाख १० हजार, तीनमध्ये २८ दुकानदारांकडून एक लाख ४० हजार, चारमध्ये १४ दुकानदारांकडून ७० हजार, पाचमध्ये १५ दुकानदारांकडून ७५ हजार, सहामध्ये १९ दुकानदारांकडून ९५ हजार, आठमध्ये २२ दुकानदारांकडून एक लाख १५ हजार असा एकूण १९२ दुकानदारांकडून नऊ लाख ७० हजार रुपयांचा दंड वसूल केला आहे.

# नेताजी प्रशालेत बेडन पॉवेल यांची पुण्यतिथी साजरी



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** निलम नगर येथील नेताजी सुभाषचंद्र बोस प्रशालेत स्काऊट गाईडचे जनक लॉर्ड बेडन पॉवेल यांची ८५ वी पुण्यतिथी साजरी करण्यात आली. प्रथम लॉर्ड बेडन पॉवेल यांच्या प्रतिमेचे पूजन मुख्याध्यापक रविशंकर कुंभार व पर्यवेक्षक गौरीशंकर आळंगे यांच्या हस्ते करण्यात आला. या प्रसंगी स्काऊट गाईडचे शिक्षक अशोक पाटील, बसवराज तेग्गेळी, शैलेश स्वामी, गणपती पाटील, विजयालक्ष्मी माळवदकर, जयश्री बिराजदार भाग्यश्री महाजन आदी उपस्थित होते.अंजली तावस्कर या विद्यार्थिनीने लॉर्ड बेडन पॉवेल यांच्या जीवन कार्याविषयी माहिती सांगितली. याप्रसंगी श्रीपूर येथे झालेल्या स्काऊट गाईड जिल्हा मेळाव्यात शोभायात्रा तसेच तंबू सजावट स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकविल्याने स्काऊटर समर्थ अलदी, कार्तिक गुत्तीकोंडा, शुभम सरवदे, आदित्य बोद्दुल, ओंकार एडके, निरंजन शिरगे, साईप्रसाद कोक्कूल, साई पवार, अजय इरकल, लोकेश वड्डेपल्ली, आकाश भैरामडी, प्रतीक दंडवते, नागराज श्रीगण, दर्शन चितळे, हर्षद विटकर, सिद्धार्थ नल्ला, प्रथमेश श्रावण व गाईड विभागाचे रक्षिता सुकनपल्ली, सृष्टी हुमनाबादे, कृतिका चव्हाण, श्रेया अल्लम, अनुष्का पुजारी, पूर्वा रॅके, श्रुतिका मामडयाल,बबिता कोटा,कावेरी पगडयाल, लहरिका वडेपल्ली,लहरिका गोने, हेमा झुंजा, आरती मामडयाल, ईश्वरी नलावडे, गायत्री बहिरगोंड, सोनाक्षी चव्हाण, प्रतीक्षा श्रावण, रोहिणी पुजारी, निहारिका नुत्ती, संस्कृती खराटे आदी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आला.

याप्रसंगी प्राचार्य रविशंकर कुंभार म्हणाले, बेडन पॉवेल यांनी अराजकीय, निधर्मी, सर्वधर्मसमभावाची भावना जोपासणारी गणवेशधारी तरुणांची आंतरराष्ट्रीय स्काऊट गाईड चळवळ संस्था उभारल्याने लाखो विद्यार्थ्यांवर चांगले संस्कार होत असल्याचे सांगितले. गाईड कॅप्टन जयश्री बिराजदार , स्काऊटर अशोक पाटील, विजयालक्ष्मी माळवदकर, गौरीशंकर आळंगे आदींनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विश्वाराध्य मठपती यांनी केले तर शिवानंद पुजारी यांनी आभार मानले.

# प्रकाश यलगुलवार यांच्या वाढदिवसानिमित्त आरोग्य तपासणी




**सोलापूर, (कटूसत्य वृत्त) :-** नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लाइंड जिल्हा शाखा सोलापूर संचलित स्वामी विवेकानंद शिक्षण संकुल एमआयडीसी सोलापूर व नॅशनल इंटिग्रेटेड मेडिकल असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने नॅव संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रकाश यलगुलवार यांच्या ७६ व्या वाढदिवसानिमित्त आयोजित केलेल्या मोफत आरोग्य तपासणी व औषधोपचार शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

प्रारंभी नंदीध्वज पूजन करून मिरवणूक काढण्यात आली. या कार्यक्रमास नॅव खजिनदार तथा निमाचे अध्यक्ष डॉ. चंद्रकांत कुलकर्णी, उपाध्यक्षा अनुगीता पवार, सीमा यलगुलवार तसेच निमा संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते. नॅव संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रकाश यलगुलवार यांचे मुख्याध्यापिका सीमा यलगुलवार यांनी उत्साहात स्वागत केले. यावेळी निमा संघटनेद्वारे शाळेतील विद्यार्थ्यांचे आरोग्य तपासून त्यांना मोफत औषधे देण्यात आली. या कार्यक्रमात परिसरातील महिला, पुरुष व शाळेतील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. या आरोग्य शिबिरामध्ये शुगर, बीपी, सर्दी, खोकला, पोटदुखी व इतर आजारांची मोफत तपासणी करून मोफत औषधे देण्यात आली.

हे आरोग्य शिबिर यशस्वी करण्यासाठी प्राथमिकच्या मुख्याध्यापिका व्हनमाने, माने, सपताळे, मिरेकर, राठोड, कोळी, शिंदे, हिंगमिरे, शहापुरे, वनसोडे यांनी परिश्रम घेतले. सुभाष माने यांनी सूत्रसंचालन करून आभार मानले.

# आवताडे शुगर कडून २८०० रु. प्रमाणे ऊस बिल खात्यावर जमा - चेअरमन आवताडे



**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** पंढरपूर मंगळवेढा मतदारसंघाचे आमदार समाधान आवताडे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या आवताडे शुगर अँड डिस्टीलरीज प्रा. लि. नंदुर. या साखर कारखान्याचे गळीत हंगाम २०२४-२५ मधील ३० नोव्हेंबर पर्यंतचे उसाचे बिल २८०० रुपये प्रति टन याप्रमाणे शेतकरीज ऊस उत्पादकांच्या खात्यात जमा करण्यात आल्याची माहिती कारखान्याचे चेअरमन संजय आवताडे यांनी माध्यमांना दिली . यावेळी मंगळवेढा मार्केट कमिटीचे माजी सभापती सोमनाथ आवताडे, मुख्य कार्यकारी अधिकारी कुर्मदास चटके, कार्यकारी संचालक मोहन पिसे, भारत निकम, सरव्यवस्थापक (टेक्नी) सुहास शिनगारे, मोहन पवार, संभाजी फाळके, बजीरंग जाधव, शेती अधिकारी राहुल नागणे, तोहीद शेख, दामोदर रेवे उपस्थितीत होते. यावेळी बोलताना चेअरमन संजय आवताडे म्हणाले की २ वषार्पूर्वी आमदार समाधान दादा आवताडे यांच्या मार्गदर्शनाखाली फॅबटेक समूहातून हा कारखाना खरेदी करून आवताडे उद्योग समुहाने घेतल्यानंतर कारखान्याचा हा तिसरा हंगाम सुरू असून कारखान्याची वाटचाल व्यवस्थित सुरू आहे. आम्ही हा कारखाना केवळ शेतकऱ्यांच्या हितासाठी घेतला असून या कारखान्यामधून आम्ही कोणताही स्वार्थ ठेवला नाही, आतापर्यंतच्या गळीत हंगामामध्ये कारखान्याचे सर्व कर्मचारी, ऊस वाहतूकदार, ऊसतोड मजूर व कारखाना प्रशासनाने मन लावून व प्रामाणिक काम केल्यामुळे आम्ही मागील दोन्हीही गळीत हंगाम यशस्वीरित्या पार पाडले.

यावेळीही असेच सहकार्य सर्व कर्मचारी, ऊस पुरवठादार, ऊस उत्पादक हे करत असून आजअखेर 2 लाख मेट्रिक टन गाळप केले आहे. गळीत हंगाम यशस्वीरित्या पार पाडून शेतकऱ्यांचे समाधान होईल असा कारभार करून शेतकऱ्यांच्या विश्वासाला पात्र राहण्याचा प्रामाणिक प्रयत्न करू तरी ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी आमच्यावर विश्वास ठेवून आपला ऊस आवताडे शुगरला घालून सहकार्य करावे असे आवाहनही चेअरमन संजय आवताडे यांनी शेतकऱ्यांना केले आहे.

# आजीने आई वडिलासहीत घरातून हाकलून लावलेल्या बालकांना विधी सेवा प्राधिकरणामार्फत मिळाले आश्रय...

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर येथे राहणाऱ्या सुहासिनी (बदलेले नांव) हिला कौटुंबिक वादातून तिच्या सासुने पती व मुलासहीत घरातून बाहेर काढले. सदरची महिला ही आशावर्कर म्हणून काम करते पती मिटर रिडींगचे काम करतो. सदर महिला तिचे पती व मुलांना घेवून पोलीस स्टेशन, पोलीस आयुक्त यांच्याकडे तक्रार दाखल केली. दोन ते तीन दिवस इतर नातेवाईकांकडे कसेबसे निवारा घेतला.

त्यानंतर नवीन वर्षाच्या पहिल्याच दिवशी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सोलापूर या कार्यालयाशी संपर्क साधला त्यावेळी कार्यालयातील रिटेनर विधीज्ञ श्रीमती. मोरडे, श्रीमती. कदम, श्रीमती. किणगी, श्रीमती. मानसी कुर्डूकर यांनी त्यांना कायदेशीर सल्ला दिला. एम. आय.डी.सी. पोलीस स्टेशनचे अंमलदार हे महिलेचे सासुच्या घरी गेले असता, सासुने दार उघडले नाही आणि प्रतिसाद ही दिलेला नाही.

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सोलापूर येथे राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली यांच्या निदेर्शाप्रमाणे गरजू मुलांना कायदेशीर व इतर सेवा पुरविण्याकरिता बालकांसाठी कायदेशीर सेवा युनिट 2024 समितीची स्थापना करण्यात आली आहे. सदर समितीच्या माध्यमातून मा. श्री. सलमान आझमी, अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सोलापूर यांच्या मार्गदर्शनाखाली सदरील युनिटच्या माध्यमातून विधी स्वयंसेवक श्रीमती. हुसेनबी खरादी व श्रीमती. विमला गुळेद यांनी महिलेच्या सासुशी सौदाहर्यपणे संवाद करुन समजूतीने सासु व सुनेतील वाद सामंजस्याने संपुष्टात आणले व अशाप्रकारे महिला तिचे पती व दोन लहान मुले यांना पुनश्चः आपल्या घरात आश्रय मिळवून दिला.